सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २६५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# कल्याण डोंबिवलीत भाजपची हॅट्रिक!



**ठाणे :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने महायुतीच्या विजयाचा शुभारंभ केला. येथील प्रभाग क्र. १८ मधून रेखाताई चौधरी आणि प्रभाग क्र.२६–क मधून आसावरीताई केदार नवरे, रंजना पेणकर यांची नगरसेविकपदी बिनविरोध निवड झाली. कल्याण डोंबिवली महापालिकेत भाजपने हॅट्रिक केली असून तिसरा उमेदवार बिनविरोध विजयी झाला. प्रभाग २६ ब मध्ये भाजपच्या बालेकिल्यामध्ये रंजना मितेश पेणकर यांची बिनविरोध निवड झाल्याने भाजप समर्थकांनी आनंद व्यक्त केला आहे. रेखा चौधरी, आसावरी नवरे यांच्यानंतर आता रंजना पेणकर बिनविरोध विजयी झाल्याने भाजपने केडीएमसी महापालिकेत तिसरा विजय मिळवला आहे. या विजयानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी तिन्ही विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी कल्याण डोंबिवलीचा गड राखल्याचं पाहायला मिळत आहे. कारण, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या प्रभागातही भाजप उमेदवाराची बिनविरोध निवड झाली आहे.

## काँग्रेसचा केला 'वंचित'ने गेम!

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने युतीची घोषणा केली. या युतीमध्ये वंचित बहुजन आघाडीला ६२ जागा सोडण्यात आल्या. एकीकडे काँग्रेसकडून इतर पक्षांची एक–दोन जागांवर बोळवण करण्याचा प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे वंचितला ६२ जागा दिल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते. वंचितसोबतच्या आघाडीने मुंबईतील राजकीय समीकरणावर परिणाम होईल अशी चर्चा होती. मात्र, मतदानापूर्वीच काँग्रेस–वंचितच्या आघाडी १६ जागांवर फटका बसला आहे. वंचितने आपल्या वाट्याला आलेल्या जागांवर उमेदवार उभे न केल्याचा फटका आघाडीला बसला आहे. काँग्रेसने मुंबईत वंचितला तब्बल ६२ जागा दिल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त करण्यात आलं.

## १५ जानेवारीला मिळणार भरपगारी सुट्टी

**मुंबई :** १५ जानेवारी २०२६ मतदानादिवशी सर्व नोकरदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून सरकारने सरकारी, निमसरकारी तसेच खासगी कंपन्या, कारखाने, दुकाने, हॉटेल्स, मॉल्स आणि आयटी क्षेत्रातील सर्व कर्मचाऱ्यांना पूर्ण पगारी सुट्टी देण्यात येणार आहे.









# महामार्ग की मृत्यूचा सापळा?

## एन.एच. १६१-ए वर अतिक्रमणाचा विळखा; अपघातांच्या संख्येत मोठी वाढ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३१ डिसेंबर-**

माहूर-किनवट-नांदेड या राष्ट्रीय महामार्ग (१६१-ए )वर सध्या अतिक्रमणाने कळस गाठला असून, यामुळे हा मार्ग वाहनधारकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. शहरांपासून गावांपर्यंत अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला,रस्त्यांवर अनाधिकृत बांधकामे आणि अडथळे निर्माण झाले आहेत. याकडे महामार्ग प्रशासन आणि पोलीस विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने संताप व्यक्त होत असून, अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.



**गावागावांत अतिक्रमणाचे जाळे**

वाई, सारखणी, किनवट, बोधडी, इस्लापूर, हिमायतनगर आणि भोकर या मुख्य गावांच्या,शहरांच्या परिसरात महामार्गावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. रस्त्याच्या अगदी कडेला हॉटेल, दुकाने आणि कच्च्या टपऱ्या थाटल्या गेल्या आहेत.काही महापुरुषाचें पुतळे ,नावांचे फलक विनापरवानगी बसविण्यात आले आहेत . यामुळे महामार्गाची रुंदी कमी झाली असून, वाहन चालवताना समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

**वाहनधारकांना दमदाटी आणि हजेरी**

केवळ अतिक्रमणावरच हे थांबले नसून, या भागात बाहेरून येणाऱ्या वाहनधारकांना स्थानिक अतिक्रमणधारकांकडून दमदाटी केली जात असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. किरकोळ अपघात किंवा वाहन उभे करण्यावरून प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यामुळे या मार्गावरून प्रवास करताना वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात?**

राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाने या गंभीर समस्येकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासनाकडून 'अतिक्रमण हटाव' मोहीम राबवली जात नाही. प्रशासनाच्या या सुस्त कारभारामुळेच अतिक्रमणधारकांचे धाडस वाढल्याचे बोलले जात आहे.

**नागरिकांची मागणी:**

महामार्ग प्रशासनाने तातडीने मोजणी करून अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करावीत, हुज्जत घालणाऱ्या आणि दमदाटी करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाने कठोर गुन्हे दाखल करावेत, अपघातप्रवण क्षेत्रांत (इश्ररलज्ञ डॉीं) तातडीने सूचना फलक आणि गतिरोधक बसवावेत. जर प्रशासनाने लवकरच यावर कारवाई केली नाही, तर या महामार्गावर मोठे जनआंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक प्रवाशांनी आणि नागरिकांनी दिला आहे.

# देगलूरात 'फिट इंडिया'चा फज्जा

**मिलिंद वाघमारे**
**देगलूर, दि. ३१ डिसेंबर-**

देगलूर येथील तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयाच्या पाठीमागील भागात नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेले ओपन जिम सध्या आरोग्य केंद्र न राहता अक्षरशः कचराकुंडीचे रूप धारण केल्याचे दिसत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या ओपन जिम परिसरात आजूबाजूच्या भागातून मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असून संपूर्ण परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला आहे. तसेच याठिकाणी काटेरी झुडपे आणि गवत वाढलेआहे.

केंद्र व राज्य सरकारच्या 'फिट इंडिया' आणि 'स्वच्छ भारत' अभियानाचा गवगवा केला जात असताना, प्रत्यक्षात या अभियानांचा येथे पुरता फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे. नागरिकांच्या आरोग्यासाठी उभारण्यात आलेली व्यायामाची साधने आज कचरा, दुर्गंधी आणि झुडपांच्या विळख्यात अडकली आहेत. ओपन जिम परिसरात मोठ्या प्रमाणावर गवत व काटेरी झुडपे वाढली असून अनेक साधने निकामी होण्याच्या मार्गावर आहेत. ही ओपन जिम नागरिकांना व्यायामासाठी प्रेरणा देणारी असायला हवी होती. मात्र परिसर पूर्णतः ओपन असल्याने येथे प्लास्टिक कचरा, घरगुती कचरा, उरलेले अन्नपदार्थ, कागदपत्रे टाकली जात असल्याचे विदारक चित्र रोज पाहायला मिळते. परिणामी दुर्गंधी पसरत असून नागरिकांना येथे व्यायाम करणे तर दूरच, थांबणेही मुश्किल झाले आहे.

विशेष म्हणजे तहसील व पंचायत समिती यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांच्या अगदी आवारातच



ही दयनीय अवस्था निर्माण झाली असतानाही जबाबदार अधिकारी व प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. एकीकडे याच कार्यालयांतून ग्रामीण भागात स्वच्छतेचे धडे दिले जातात, तर दुसरीकडे स्वतः च्या परिसरातील ओपन जिमची झालेली दुरवस्था अत्यंत लाजिरवाणी ठरत आहे. लाखो रुपयांचा निधी खर्चून उभारण्यात आलेल्या या ओपन जिमकडे स्थापनेनंतर पूर्णतः दुर्लक्ष झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ओपन जिमचा मूळ उद्देश पूर्णतः फोल ठरत असून, आरोग्य संवर्धनाऐवजी आजारांना निमंत्रण देण्याचे काम येथे सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, स्वच्छतेबाबत नागरिकांत जनजागृती करावी, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, संरक्षण जाळी (फेन्सिंग) उभारावी तसेच नियमित देखरेख व देखभाल यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. प्रशासन आता तरी जागे होणार का? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

## विभागीय पोस्टर मेकिंग स्पर्धेतून रणजीत वर्मा यांची राज्यस्तरावर निवड

**माहूर** - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था लातूर यांच्यातर्फे आयोजित दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे शिक्षक कर्मचारी व अधिकारी यांच्या विभागीय स्तरावरील स्पर्धेत माहूर येथील प्रसिद्ध चित्रकार तथा शिक्षक रणजीत



दत्तात्रय वर्मा यांची 'पोस्टर मेकिंग या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य स्तरावर निवड झाली असून तालुका, विभाग व राज्य अशा फेऱ्यांमधून या स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत.रणजीत वर्मा यांनी विभागीय स्तरावर 'विषमुक्त शेती' या विषयावर चित्रांकन अर्थात रासायनिक खते आणि कीटकनाशके टाळून, नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धती वापरून आरोग्यदायी आणि पर्यावरणाला पूरक अन्न पिकवण्याच्या पद्धतींचे दृश्य स्वरूपात अतिशय प्रभावीपणे सादरीकरण केले होते. त्यावरुन पुढील स्पर्धेसाठी राज्यस्तरावर त्यांची निवड करण्यात आली आहे. 'पोस्टर मेकिंग स्पर्धा' ही एक अशी स्पर्धा जिथे स्पर्धक दिलेल्या विषयावर त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देऊन आकर्षक आणि प्रभावी पोस्टर बनवतात, ज्यातून लोकांना महत्त्वाचा संदेश देणे, जनजागृती करणे किंवा एखाद्या गोष्टीची जाहिरात करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये रंग, चित्रे, आणि मजकूर वापरून एक व्हिज्युअल कथा तयार केली जाते. प्रत्येक स्पर्धेला एक विशिष्ट विषय असतो, जसे की 'पर्यावरण संरक्षण', 'डिजिटल सुरक्षा' किंवा 'आरोग्य'. यातील स्पर्धकांना त्यांच्या कल्पनाशक्तीनुसार पोस्टर डिझाइन करण्याची मुभा असते.लोकांना माहिती देणे, त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना कृती करण्यास प्रवृत्त करणे हा या स्पर्धेमागचा उद्देश आहे.या कलात्मक स्पर्धेत स्पर्धक रणजित वर्मा यांनी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे 'विषमुक्त शेती' या विषयावर चित्रांकनाच्या माध्यमातून आपल्या विचारांना दृश्यात्मक रूपात मांडताना रासायनिक खते आणि कीटकनाशके टाळून, नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धती वापरून (जसे की जैविक खते, शेणखत, गांडूळ खत) आरोग्यदायी आणि पर्यावरणाला पूरक अन्न पिकवण्याच्या पद्धतींचे दृश्य स्वरूपात अतिशय प्रभावीपणे सादरीकरण केले. ज्यामध्ये मातीचे आरोग्य, जैवविविधता आणि मानवी आरोग्य यावर भर दिला, जेणेकरून विषमुक्त शेतीचे महत्त्व आणि फायदे चित्रांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवता येतील. चित्रकार वर्मा यांनी विषमुक्त शेती विषयक चित्रांकन करताना रासायनिक शेतीचे तोटे आणि सेंद्रिय/नैसर्गिक शेतीचे फायदे दृश्य माध्यमांतून प्रभावीपणे लोकांपर्यंत कसे पोहोचतील यासाठी आपल्या अंगभूत कलागुणांनाचा पुरेपूर वापर केला, जेणेकरून शेतकरी आणि ग्राहक दोघेही याबद्दल जागरूक होतील. या निवडीबद्दल प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधवराव सलगर, शिक्षणाधिकारी योजना दिलीप कुमार बनसोडे, गटशिक्षणाधिकारी माहूर संतोष शेटकार, शेषराव पाटील (महा.रा.शिक्षक परिषद तालुकाध्यक्ष माहूर), संजय वाठोरे,जितेंद्र वर्मा, पत्रकार बजरंगसिंह हजारी,रमेश मुनेश्वर,भाग्यवान भवरे,अजय पोपुलवार,सुरेश गिऱ्हे, मिलिंद कंधारे, अरविंद जाधव,अरूण धकाते, विजय घाटे, प्रवीण वाघमारे,राजू मार्गमवार यांसह अनेकांनी चित्रकार रणजित वर्मा यांचे अभिनंदन करत पुढील राज्यस्तर निवडीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## बँक ऑफ महाराष्ट्र कडुन देगलूर महाविद्यालयास १६ सिमेंट बेंचची भेट

**देगलूर** -अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील भव्य मैदान, बॉटनिकल गार्डन व ग्रंथालय परिसरात विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच विरंगुळ्यासाठी आरामदायी बसण्याची सुविधा



उपलब्ध व्हावी, या उद्देशाने बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा देगलूर यांच्यावतीने १६ सिमेंट बेंच भेट देण्यात आले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने माजी विद्यार्थी, डॉक्टर, उद्योगपती, वकील, स्वयंसेवी संस्था, बँका, व्यावसायिक व पालकांनी शिक्षण संस्थांसाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत असते. या सामाजिक जाणिवेतून बँक ऑफ महाराष्ट्र, लातूर विभागाचे झोनल मॅनेजर दिगंबर महाडिक, देगलूर शाखेचे मुख्य व्यवस्थापक रामावत लोकेशकुमार तसेच सहव्यवस्थापक बादावत विनोदकुमार व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालय, मैदान व उद्यानासाठी सिमेंट बेंच उपलब्ध करून दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास, चर्चा व विश्रांतीसाठी सोयीस्कर सुविधा मिळणार असून, बँक ऑफ महाराष्ट्रने आपली सामाजिक बांधिलकी जपल्याचे स्पष्टपणे दिसून येते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य अनिल चिद्रावार, डॉ. बालाजी कतूरवार, डॉ. संजय पाटील, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. नीरज उपलंचवार व डॉ. संजय देबडे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरत असून, शिक्षण संस्था व बँकिंग क्षेत्रातील सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरतो.

# भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते क्षितीज जाधव राष्ट्रवादीत; उमेदवारी देण्यात अन्याय केल्याचा आरोप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ डिसेंबर-**




शहरातील वार्ड क्रमांक सहामध्ये घडलेल्या राजकीय घडामोडींमुळे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठा राजकीय भूकंप झाला आहे. वर्षानुवर्षे भाजपशी एकनिष्ठ राहिलेले, वार्डात प्रचंड जनसमर्थन असलेले निष्ठावंत कार्यकर्ते क्षितिज जाधव यांना भाजपकडून उमेदवारी नाकारण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. या निर्णयानंतर अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या डोळ्यात पाणी आले असून, भाजपच्या निर्णयप्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

भाजप हा शिस्तीचा पक्ष म्हणून ओळखला जातो. मात्र या प्रकरणात पक्षाच्या निर्णयामुळे ही ओळख धुसर झाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. नगरसेवक पदासाठी भाजपने दोन वेळा उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या होत्या. पहिल्या टप्प्यात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी ऑनलाइन पद्धतीने तर जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांच्या उपस्थितीत मुलाखत घेतली होती. दुसऱ्या टप्प्यात खासदार अजित गोपचडे यांच्या कार्यालयात उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या. या दोन्ही टप्प्यांत क्षितिज जाधव यांनी प्रभावीपणे आपली बाजू मांडली होती आणि वार्डातूनही त्यांना मोठा प्रतिसाद मिळत होता.

मात्र उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसचे माजी महापौर किशोर भवरे व त्यांच्या पत्नी शीला भवरे यांना भाजपमध्ये प्रवेश देत थेट उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे अनेक वर्षांपासून तयारी करत असलेले भाजपचे प्रबळ व निष्ठावंत दावेदार क्षितिज जाधव यांना डावलण्यात आले. या निर्णयामुळे वार्ड क्रमांक सहामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाची लाट पसरली आहे.

या अन्यायाविरोधात क्षितिज जाधव यांनी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देत वार्ड क्रमांक सहामधून क्षितिज जाधव यांच्या पत्नी प्रवेशिका जाधव यांना उमेदवारी देत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश दिला आहे. त्यामुळे ही लढत आता थेट निष्ठावंत विरुद्ध भाजप अशी बनली आहे.

वार्ड क्रमांक सहामधील ही निवडणूक आता केवळ पक्षीय लढत न राहता निष्ठा, अन्याय आणि विकासाच्या मुद्द्यांवर केंद्रित झाली आहे. क्षितिज जाधव यांचा जनसंपर्क, कामाचा अनुभव आणि स्थानिक प्रश्नांवरील ठाम भूमिका मतदारांना कितपत प्रभावित करतात, याकडे संपूर्ण नांदेड शहराचे लक्ष लागले आहे.

# शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षक परिषद कटीबध्द : मधुकर उन्हाळे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद तालुका शाखा देगलूर ची सहविचार सभा राज शेखर मंगल कार्यालय रामपूर रोड देगलूर येथे दिनांक २७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती.

सदरील सहविचार सभेचे उद्घाटक तथा शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे यांनी उद्घाटन प्रसंगी म्हणाले, शिक्षकांना आज असंख्य अशैक्षणिक कामाना सामोरे जावे लागत आहे. शिक्षकाचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित आहेत. हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षक परिषद कटीबध्द आहे.असे प्रतिपादन तालुकास्तरीय सुविचार सभेचे उद्घाटन करताना मधुकर उन्हाळे यांनी केले.

या सहविचार सभेच्या अध्यक्षस्थानी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य संघटन मंत्री सुरेश दंडवते प्रांत प्रवक्ते दत्तप्रसाद पांडागळे,शिक्षक नेते अशोक पा. बावणे,मराठवाडा अध्यक्ष संजय कोठाळे,विभागीय कार्याध्यक्ष बालाजी पा.बामणे, जिल्हा नेते दिगंबर पा. कुरे, संभाजीराव आलेवाड, जिल्हा कार्यवाह प्रल्हाद राठोड,जिल्हा सल्लागार वैजनाथ मिसे,जिल्हा कोषाध्यक्ष बाळासाहेब पांडागळे, गुरुकृपाचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय बिरादार,जिल्हा कार्याध्यक्ष बालाजी पाम्पटवार,जिल्हा कार्यालयीन मंत्री बळवंत मंगनाळे म.रा.जुनी पेन्शन हक्क संघटना देगलूर शाखेचे अध्यक्ष विठ्ठल रेड्डी पांगरे आदीची उपस्थिती होती.

प्रास्तावित मावळते तालुकाध्यक्ष सतीश पाटील सांगवीकर यांनी केले मागील आठ वर्षाच्या कार्याचा तालुका शाखेच्या कामकाजाची माहिती,आलेल्या समस्या व त्यांना कशाप्रकारे मात केली याबद्दल सविस्तरपणे प्रास्ताविकेतून मावळत्या तालुकाध्यक्षाने आपले मत व्यक्त केले, प्रमुख मनोगत अशोक पा. बावणे, सुरेश दंडवते,दत्तप्रसाद पांडागळे,संजय कोठाळे,प्रल्हाद राठोड, वैजनाथ मिसे आदी मान्यवरांनी शिक्षक परिषदेच्या कार्याची व रचनेची माहिती दिली*

तसेच तालुक्यातील प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा करून त्यावर उपाययोजना करण्याची दिशा ठरवण्यात आली. त्याचबरोबर नूतन तालुकाध्यक्ष विरभद्र हसनाळे व कार्यवाह जितेंद्र देवकते यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षक परिषद भक्कम करण्याचे उपस्थितांना अभिवचन दिले. यावेळी ज शिक्षक नेते गोविंद बिरादार,तसेच आकाश राजुरे यांनी याप्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद मध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यांचा जाहीर प्रवेश करून सन्मान करण्यात आला.



नांदेड- शहरातील मगनपुरा नवा मोंढा येथे श्री अय्यप्पा स्वामी यांचे अभिषेक आणि महापडी पूजा संपन्न झाले. यावेळी पुरोहित बालचंद्र जक्क, गुरु स्वामी किशन घंटा, गुरु स्वामी सुधाकर पंजला, गुरु स्वामी शिवप्रसाद गडप्पा, गुरु स्वामी विवेक राजम, गुरु स्वामी धनराजसिंह बीसेन, गुरुस्वामी ओमप्रकाश राजम, गुरु स्वामी सर्वेश मुदीराज, गुरु स्वामी शिवराजसिंह ठाकुर, स्वामी विक्रमसिंह बीसेन, स्वामी किरण गौड गुन्नाला, स्वामी उत्तम व्यवहारे आदी.(छायाचित्र -नरेंद्र गडप्पा, नांदेड)

# गोदावरी अर्बनला बँकिंग एक्सलन्स आवर्ड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ डिसेंबर-**

गोदावरी अर्बनने आपल्या कार्यक्षेतातील पाचही राज्यात लघु व मध्यम उद्योग (चडचए) क्षेत्राच्या विकासासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल 'बेस्ट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून बँकिंग एक्सलन्स अवॉर्ड २०२५' या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

चेंबर ऑफ इंडियन मायक्रो,स्मॉल ॲण्ड मिडियम एंटरप्रायझेस (उखचडचए) यांच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, केंद्रीय लघू व मध्यम उद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व विकास आयुक्त डॉ. राजनेश, तसेच उखचडचए चे अध्यक्ष सी.ए. मुकेश मोहन गुप्ता यांच्या शुभहस्ते गोदावरी अर्बनचे उप सरव्यवस्थापक रवी इंगळे व वरिष्ठ मार्केटिंग अधिकारी महेश केंद्रे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लघू व मध्यम उद्योजकांना आर्थिक सक्षमतेकडे नेण्यासाठी गोदावरी अर्बनने दिलेले भक्कम कर्जपुरवठा, सुलभ बँकिंग सेवा, पारदर्शक व्यवहार व विश्वासार्ह व्यवस्थापन यामुळे संस्थेचे कार्य राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय ठरले आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या उभारणीस व विस्तारास दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेतच हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

या यशाबद्दल गोदावरी अर्बनचे संस्थापक नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्यासह समस्त संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी वृंद, सभासद व ठेवीदारांचे अभिनंदन केले.

गोदावरी अर्बनने सहकार क्षेत्रात केलेल्या सातत्यपूर्ण कार्यामुळे व सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांसाठी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे संस्थेची राष्ट्रीय स्तरावर विश्वासार्ह ओळख निर्माण होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# लोहा येथील भीषण आगीच्या घटनेची आमदार चिखलीकर यांच्याकडून पाहणी!

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३१ डिसेंबर-**

लोहा शहरात सोमवारी रात्री लागलेल्या भीषण आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. नांदेड-नागपूर मार्गावरील कलावती वजन काट्यासमोरील तीन दुकानांना मध्यरात्री आग लागून सर्वत्र गोंधळ उडाला. या आगीत 'इंदिराई ट्रेडर्स, हार्डवेअर अँड पेंट हाऊस', 'वैष्णवी बॉडी बिल्डर्स' आणि 'शिवकाशी वेल्डिंग वर्कशॉप' ही दुकाने जळून खाक झाली.



विशेषतः इंदिराई ट्रेडर्स या दुकानाचे सुमारे ३० लाख रुपयांचे सर्वाधिक नुकसान झाले असून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. अग्निशमन दलाने काही तासांच्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणली.

या घटनेची माहिती मिळताच लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. व्यापाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करून बाधितांना आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान नगराध्यक्ष शरद पवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, नगरसेवक केशवराव मुकदम, मारोती जंगले, सदानंद तेलंग, माजी संचालक अंकुश कदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, तसेच महावितरणचे अधिकारी उपस्थित होते.

आमदार चिखलीकर यांनी या प्रसंगी प्रशासनाला सांगितले की, व्यापाऱ्यांच्या नुकसानीचे योग्य मूल्यांकन करून त्यांना तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे. शासनस्तरावरही आवश्यक पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन आमदार चिखलीकर यांनी सांगितले आहे


**सौदा चिटी खरेदी खत:-**

सौदा चिटी दिसुन देणार:-
१)ओंमकार बालाजी वृत्ते वय २१वर्षे, धंदा शिक्षण. रा.लोहा ता.लोहा, जि.नांदेड
लिहून देणार
१) दिगंबर नामदेव भालेराव वय ४९ धंदा शेती, रा. माळाकोळी ता. लोहा ,जिल्हा नांदेड
२ मनमथ मारोती नागसाखरे वय ४५ वर्षे, धंदा शेती ,रा.खेडकरवाडी, ता. लोहा, जि. नांदेड
३) मल्लिकार्जुन भुजंगआप्पा स्वामी वय ४३ वर्षे,धंदा व्यापार रा. माळाकोळी ता.लोहा,जि. नांदेड
४) सिद्धांत मलिकार्जुन स्वामी वय २१ वर्षे, धंदा शिक्षण ,रा.माळाकोळी ता. लोहा जि.नांदेड

सौदा चिट्ठी लिहून देतो की माझ्या मालकी ,ताब्यातील प्लॉट, गट नंबर ४४० मधील ज्याचा प्लॉट नंबर ४ (चार) ग्रा.प. मा.म. क्रमांक ६६८ असून त्याची समोरची बाजू नांदेड लातूर रोड ५० फूट व त्यांची पाठीमागील बाजू ४८ फूट व दक्षिणे सदाशिव एकनाथ ढिकळे यांच्या शेजारील बाजू ३६ फूट व उत्तरेस २९.६ फुट यांचे एकूण क्षेत्रफळ १३५५ चौ..फुटाची चतुर्सिमा आहे
१)पूर्वेस :नांदेड लातूर रोड २)पश्चिमेस:रस्ता ३) दक्षिणेस:सदाशिव एकनाथ डिकळे यांचे प्लॉट ४) उत्तरेस:रस्ता

या चतुरसिमेमधील मालकी ताब्यातील प्लॉट मी आज रोजी तुम्हाला विक्री केला आहे त्याची किंमत ४००० रुपये (चार हजार रुपये) या प्रमाणे १३५५ चौ.फु.ची पूर्ण रक्कम ५४२००००/ (चौपण लाख वीस हजार) आहे.

तरी आज सौदा चिटीवर १,२५५५१(एक लाख पंचवीस हजार पाचशे एक्कावन) दिले. उर्वरित रक्कम रजिस्ट्री व बैयनामा झाल्यापासून (०५/०२/२०२६ पर्यंत)दोन महिन्यात पर्यंत रजिस्टरी करण्याचे ठरले आहे या सौद्यात दोन पंच साक्षिदाराच्या साक्षिने व्यवहार केला आहे हे बरोबर.

सदर प्लॉट मोजणी मध्ये कमी जास्त झाले तर देवान घेवान व्यवहारामध्ये कमी जास्त रक्कम होईल असे समक्ष ठरले आहे

साक्षीदार
१)दिगंबर नामदेव डिकळे वय वय ६६ वर्षे धंदा शेती रा.पारडी ता.लोहा जि. नांदेड
२ )खुशाल मधुकर भुजबळ वय ४३ वर्षे,रा. धानोरा (शेलगाव) ता.लोहा,जि. नांदेड

नोट :सदरिल व्यवहारात कोणाला आक्षेप असेल तर तिस दिवसांत विक्री करणारा व खरेदीकरणारा यांच्याशी संपर्क करून तक्रार करावी यानंतर आपला आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार आहे यांची नोंद घ्यावी

जाहिर प्रगटन आर्थीक व्यवाहाराच्या शपथ पत्रद्वारे देण्यात येत आहे.

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २६५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



## अग्रलेख...

# पुढच्या पावलाची ऊर्जा!

या विश्वामध्ये पृथ्वीसारखे सौंदर्य, सजीवता आणि वैविध्यता असलेला आणखी कोणी ग्रह, तारा असेल की नाही, माहीत नाही. पण पृथ्वीवरचा प्रत्येक सजीव हा भाग्यवानच म्हटला पाहिजे. कारण, अन्यत्र कोठेही कोणाच्याही वाटणीस आलेले नाही असे जीवन, म्हणजे जगणे अनुभवण्याचे भाग्य त्याला मिळाले आहे. तो कोणत्याही रूपाने जन्माला आलेला असला, तरी त्याच्या आयुष्यावर त्याचे नेहमीच प्रेम असते आणि आपल्या वाटणीला आलेले आयुष्य जपण्यासाठी तो सदैव धडपड करत असतो. सजीवांचे वास्तव्य असलेल्यांच्या या जगात माणसाचा जन्म लाभणे हे दैवदुर्लभ भाग्य मानले जाते. कारण या सृष्टीमध्ये असंख्य सजीवांना निसर्गाने जन्म दिलेला असला, तरी मनुष्यजीवावर मात्र त्याची विशेष माया आणि मेहेरबानीदेखील आहे. अन्यांच्या जगण्यावर कायमच असुरक्षिततेचे सावट दाटलेले असते आणि त्या सावटाखाली वावरतानाही, सुरक्षित राहण्यासाठी आणि आपल्या वाटणीला आलेल्या जन्माची पालखी वाहण्यासाठी पुढची पिढी तयार करण्यासाठी धडपडणे एवढाच त्या अन्य सजीवांच्या जगण्याचा उद्देश असतो. माणसाचे जगणे मात्र याहून बरेच वेगळे असते. केवळ जन्माला आल्यापासून मृत्यू येईपर्यंतचे आयुष्य म्हणजे जगणे नाही, तर जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यानच्या वाटचालीत जे काही आयुष्य वाट्याला आलेले असते, त्याचे सोने करण्यासाठी धडपडणे हे खरे जगणे असते हे माणसाएवढे अन्य कोणाही सजीवास माहीतदेखील नसते. म्हणून माणसाचा जन्म हा अन्य कोणत्याही सजीवाहून श्रेष्ठ मानला जातो, कारण तसे आयुष्य पृथ्वीवरच्या अन्य कोणा अन्य सजीवास लाभलेले नसते आणि पृथ्वीबाहेरच्या विश्वात सजीव आहेत किंवा नाही यांचाच अजून शोध सुरू असल्याने, अन्यत्र कोठे माणसाएवढा प्रगत सजीव सापडण्याची शक्यताही नसते. म्हणूनच, जन्माला आल्यानंतर सुरू होणारा प्रवास हा खरे तर अज्ञाताचा प्रवास आहे हे माहीत असूनही, त्या प्रवासाच्या वाटेवर आनंदाचे मळे फुलविण्याचा माणसाचा प्रयत्न सतत सुरू असतो. कधी कधी त्याचीही स्पर्धा सुरू होऊन आपला मळा अधिक सुशोभित करण्याच्या हट्टापायी अन्यांचे मळे उद्ध्वस्त करण्याची दुर्बुद्धी कोणा एखाद्यास सुचत असेलही, पण कोठेतरी, कोणाचे तरी आनंदाचे मळे फुलविणे हा त्यामागचाही हेतू दुर्लक्षित करता येत नाही. सुखाच्या आणि समाधानाच्या वाटचालीत अनेकदा वेडीवाकडी वळणे लागतात, चढउतार लागतात, कधी चालताना दमछाकही होते. या प्रवासाच्या एखाद्या टप्प्यावर अनेक रात्री अनुभवाव्या लागतात, पण ही रात्र संपली की उद्या पुन्हा नवा सूर्य उगवणार आहे आणि नवा दिवस सुरू होऊन त्याच्यासोबत मिळणारी नवी ऊर्जा घेऊन नव्या उमेदीने पुढचा प्रवास करणार आहोत, हेही प्रत्येकास ठावूक असते. सूर्य मावळला की अंधार पडणार आहे आणि रात्र संपली की अंधारही संपून उजेडाची तिरीप पाहायला मिळणार आहे, या विश्वासाने चालताना अंधारवाटेवरदेखील पावले अडखळत नाहीत आणि मागे हटत नाहीत. पुढे पडणाऱ्या प्रत्येक पावलासोबत कधी सहजपणे, कधी खडतरपणे, कधी एकाकीपणे, तर कधी कुणाच्या आधाराने, प्रवासाची ही अज्ञात वाट चालत राहावी लागते. वाटेवरच्या अडथळ्यांची, वळणांची किंवा चढउतारांची पर्वा न करता चालत राहणे हेच जगणे असते. त्या चालण्याच्या प्रत्येक पावलावर आनंद उधळावा आणि तो एकमेकांसोबत वाटून घ्यावा. यातूनच प्रवास सुखकर होईलच, पण आपल्यासोबत चालणारे, आपल्या आसपासचे अशाच प्रवासातले वाटसरूदेखील आनंदाने पुढची पावले टाकतील आणि जगण्यातील आनंदाच्या अनुभवाने सुखावतील.

खरे म्हणजे, या वाटचालीसोबत पाठीवर घेतलेला दिवसाचा भार आपण नेहमीच आनंदाने वाहत असतो. त्या वाटचालीला साथ देणारा सूर्य दररोजच उगवतो आणि मावळल्यानंतर होणाऱ्या रात्रीचा अंधार संपून नवा दिवस सुरू होणार याची आपल्याला खात्रीही असते. म्हणूनच, कोणताही एखादा मावळता दिवस किंवा कोणताही एखादा नव्याने उगवणारा दिवस निसर्गाच्या नजरेत सारखाच असतो. त्यावर वेगळेपणाचा साज आपण, माणसांनी चढविलेला असतो. कारण त्या वेगळेपणाचा साज चढवून सजविला गेलेला दिवस वाटचालीतील आनंदाला नवी उमेदही देत असतो. संस्कृतीच्या संस्कारांनी संपन्न झालेल्या समाजाच्या जगण्याच्या प्रत्येक दिवसाची सुरुवातच पृथ्वीच्या स्तुतिस्तोत्राने होते आणि मावळल्यानंतरच्या नव्या दिवसाच्या प्रतीक्षेचा अंधारलेला काळदेखील पृथ्वीची प्रार्थना करून सरतो, त्यांना अशा एखाद्या दिवसाच्या वेगळेपणाचे अप्रूप असतेच असे नाही. पण जेव्हा आनंद वाटून घ्यायचा हे ठरलेलेच असते, तेव्हा जगाच्या जल्लोषाकडे त्रयस्थपणे पाहात राहण्याहूनही, त्यांच्या आनंदाची काही फुले आपल्या आसपासही उधळली गेली तर त्यात गैर काहीच नाही. म्हणूनच, नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला, काही काळासाठी तरी जुन्याचा विसर पडतो. ते सहजपणे होत जाते. कारण, ज्याला जगभरातील मनुष्यमात्राने नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येचा साज चढविलेला असतो, त्या वर्षअखेरीचा दिवस हा केवळ जल्लोषाचा नसतो. सरलेल्या काळातील कडू गोड आठवणींतून समाधानाचे धागे वेचून ते एकत्र करण्याचा व नव्या वाटचालीच्या वस्त्रामध्ये त्या धाग्यांची नक्षी सजवून पुढची वाटचाल सजविण्याचा सण म्हणून अशा दिवसाकडे पाहावयास हवे. अनुभवांनी भरलेल्या प्रवासातले एक पाऊल पार पडले, याचा आनंद साजरा करावा आणि पुढच्या पावलाची उमेद गाठीशी बांधावी, हाच त्या दिवसावर दाटलेल्या वेगळेपणाच्या जाणिवांचा हेतू असावा. आपल्याला पुढेच चालावयाचे आहे, हे नक्की असल्याची खात्री झाली, की पुढचा प्रवास आनंदाचा कसा होईल याची गणिते आखता येतात. तसे केले तरच पुढच्या प्रवास सोपा होईल, ही खूणगाठ मनाशी पक्की असणे कधीही चांगलेच!

तसे पाहिले, तर आपणा भारतवासीयांसाठी सांस्कृतिकदृष्ट्या आजच्या दिवसाचे वेगळेपण जाणवावे असेही नाही. अशा आनंदाची उधळण करण्यासाठी आपल्या संस्कृतीने अनेक सण, सोहळ्यांची सजावट करून आपल्या परंपरेची पालखी अगोदरपासूनच सजविलेलीही आहे. ती पालखी खांद्यावर घेऊनच जो समाज भविष्याची वाटचाल आनंददायक होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो, सहकार्याच्या, बंधुभावाच्या आणि एकतेच्या भावनेने परस्परांस सोबत देत राहतो, त्या समाजासाठी डिसेंबरचा अखेरचा दिवस किंवा जानेवारीचा पहिला दिवस हे काही सण नाहीतच. तरीही पृथ्वीवरील व्यावहारिक जगाने या दोन दिवसांना काही वेगळेपण बहाल केले असल्याने, त्याकडे पाहणे हा उपचार असला, तरी व्यवहारदेखील ठरला आहे. सरत्या वर्षात प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावावी अशा अनेक घटना घडल्या आहेत. या घटनांच्या शिदोरीनिशी उद्यापासून होणारी नव्या वाटचालीची सुरुवातही, नवी उमेद, नव्या महत्त्वाकांक्षा आणि नव्या जाणिवांनिशी होणार आहे. येत्या पंचवीस वर्षांचा काळ हा आपल्या वाटचालीचा अमृतकाळ असणार आहे. या अमृतकाळाची समाधानी सुरुवात सरत्या वर्षाने करून दिली आहे. म्हणून सरत्या वर्षाला आभारपूर्वक निरोप द्यायलाच हवा! कारण प्रत्येक सरत्या वर्षावर उमटणाऱ्या पाऊलखुणा पुसून नव्या पाऊलखुणा उमटविण्याचा उत्साह हीच आपली उमेद असते. प्रकाशाचा पावलापुरता कवडसाही नवी उमेद देतो आणि उद्याच्या उजेडाच्या दिशेने नव्या उत्साहाने पुढची पावले पडू लागतात. उद्या सूर्योदय होणारच आहे आणि त्या लख्ख प्रकाशातच आपण पुढचा प्रवास करणार आहोत, याची खात्री सरत्या वर्षाने दिली आहे. आज मागे वळून पाहताना, जगाच्या पाठीवर प्राप्त झालेली प्रतिष्ठा, अंतराळ कवेत घेण्याच्या ईर्ष्येने भारलेली मने, क्रांतीच्या नव्या पर्वातील तरुणाईचा सहभाग, ज्ञान, विज्ञानाच्या क्षेत्रातील चमकदार कामगिरी, अशा अनेक बाबींनी आजपर्यंतच्या वाटचालीची वाट सजविली आहे. या वाटेवर काटेदेखील होते, पण ते दूर करून पुढचे पाऊल टाकण्याची हिंमत सरत्या वर्षाने दिली आहे. म्हणून, आज लौकिकार्थाने साजऱ्या होणाऱ्या सरत्या वर्षाच्या उत्साहात सहभागी होण्यातही काही गैर नाही. कारण, सरत्या काळाने दिलेल्या अनुभवांच्या शिदोरीसाठी त्याचे आभार तर मानायलाच हवेत.

## विशेष

### प्रा. सुखदेव बखळे

# पहिला वन्यजीव सुरक्षित महामार्ग

मध्य प्रदेशमधील नौरादेही व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या महामार्गाचा सुमारे ११.९६ किलोमीटरचा भाग दोन आणि चार लेनमध्ये विकसित करण्यात आला आहे. सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या संवेदनशील वन्यजीव क्षेत्रात हे 'रेड टेबल-टॉप मार्किंग' बसवण्यात आले आहेत. एखादे वाहन या लाल ब्लॉकवरून जाते, तेव्हा चालकाला थोडासा धक्का बसतो. त्यामुळे तो त्याचा वेग कमी करतो. लाल रंग आधीच धोक्याचा सिग्नल मानला जातो, म्हणून हे तंत्रज्ञान चालकांच्या मानसशास्त्रावरदेखील परिणाम करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)च्या अधिकाऱ्यांच्या मते, वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या भागात हरिण, नीलगाय आणि इतर वन्यजीवांचे रस्ते अपघात पूर्वी सामान्य झाले होते. हा भाग धोकादायक क्षेत्र मानला जात होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानके लक्षात घेऊन हे नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यात आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फक्त 'रेड टेबल-टॉप मार्किंग'च नाही तर पाच मिलीमीटर जाडीच्या पांढऱ्या पेव्हर शोल्डर लाईन्सदेखील तयार करण्यात आल्या आहेत. एखादे वाहन रस्त्यावरून घसरले किंवा चालक झोपला तर त्यांना सतर्क करण्यासाठी त्वरित कंपनांचा वापर केला जातो. शिवाय प्राणी सुरक्षितपणे रस्ता ओलांडू शकतील, यासाठी २५ वन्यजीव अंडरपास बांधण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीपासून येथे एकही अपघात किंवा वन्यजीवांना दुखापत झाल्याचे वृत्त नाही. वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्प हा मध्य प्रदेशमधील सर्वांत मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ २,३३९ चौरस किलोमीटर आहे. त्यात १,४१४ चौरस किलोमीटरचे कोअर आणि ९२२ चौरस किलोमीटरचे बफर क्षेत्र समाविष्ट आहे.

हा परिसर भारतीय लांडगा, पँथर, जंगली कुत्रा, कोल्हा, राखाडी कोल्हा आणि ओटर यासारख्या अनेक दुर्मिळ वन्यजीव प्रजातींसाठी एक प्रमुख अधिवास आहे. २०१८ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात त्याचा समावेश करण्यात आला होता आणि वाघांची संख्या आता २६ वर पोहोचली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर पोस्ट केले की, विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलन आणि वन्यजीवांचे संरक्षण लक्षात घेऊन भारतात प्रथमच महामार्गांवर पाच मिलीमीटर लाल 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग'चा वापर करण्यात आला आहे. २०१८ मध्ये या जिल्ह्याचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात समावेश करण्यात आला. येथे चितळ, चिंकारा आणि नीलगाय यांचीही संख्या वाढत आहे. काळविटांनादेखील संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले आहे. त्यामुळे मांसाहारी प्राण्यांना नैसर्गिक अन्न चक्र मिळते. नौरादेही व्याघ्र प्रकल्प सागर, दमोह आणि नरसिंहपूर या तीन जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. हा प्रकल्प मध्य प्रदेशमधील सर्वांत मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. पेंच आणि कान्हा येथून चितळ आल्याने गेल्या तीन ते चार वर्षांमध्ये त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली आहे. संरक्षणामुळे चिंकारा आणि नीलगायींची संख्यादेखील सातत्याने वाढत आहे. काळविटांची वाढती संख्या येथील मांसाहारी प्राण्यांसाठी चांगला अन्नपुरवठा करते. दोन वेगवेगळ्या प्रसंगी १५३ आणि ३५ काळविटांना पकडून संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळला सांस्कृतिक राजधानी जबलपूरशी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ४५ चा एक महत्त्वाचा भाग आता देशभरात महामार्ग अभियांत्रिकी आणि वन्यजीव संवर्धनाचे एक मॉडेल बनला आहे.



भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प अंमलबजावणी युनिटने नरसिंहपूर आणि जबलपूरमधील सुमारे बारा किलोमीटरच्या अत्यंत संवेदनशील भागाचे संरक्षण करण्यासाठी अभूतपूर्व आणि नावीन्यपूर्ण तंत्रांचा वापर केला आहे. हा भाग वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्पाच्या (पूर्वी नौरादेही वन्यजीव अभयारण्य) सीमेवरून जातो. वन्यजीवांच्या वावरामुळे आणि डोंगराळ प्रदेशामुळे हा भाग पूर्वी एक प्रमुख ब्लॅक स्पॉट (अपघात-प्रवण क्षेत्र) मानला जात होता. महामार्ग चौकापासून बेलखेडापर्यंत असंख्य अपघात होत असत. त्यामुळे प्रवासी आणि वन्यजीव दोघांसाठीही सुरक्षित कॉरिडॉर सुनिश्चित करण्यासाठी १२२.२५ कोटी खर्चाच्या ११.९६ किलोमीटर (२-लेन ते ४-लेन रुंदीकरण) प्रकल्पात विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर पाच मिलीमीटर जाडीचे उंच लाल मार्किंग लावण्यात आले आहे. एखादे वाहन त्यातून जाते, तेव्हा हलकासा धक्का निर्माण करते. त्यामुळे चालक आपोआप वेग कमी करतो. रस्त्यावरून जाणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी सौंदर्य आणि सुरक्षिततेमुळे त्याला 'रेड कार्पेट' असे टोपणनाव दिले आहे. येथे वन्य प्राण्यांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी २५ अंडरपास बांधण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना महामार्गाच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला धोका न घेता जाता येते.

येथे वन्यजीवांना रस्ता ओलांडण्यापासून रोखण्यासाठी संपूर्ण संवेदनशील भागात 'चेन-लिंक' कुंपण बसवण्यात आले आहे. रात्रीच्या अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाच मिलीमीटर जाडीची पांढरी खांद्याची रेषा तयार करण्यात आली आहे. चालक झोपेमुळे किंवा दुर्लक्षामुळे मार्गावरून दूर जायला लागला, तर ही रेषा लगेचच तीव्र धक्का देऊन त्याला सावध करते. या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रवासी आणि वन्यजीवांसाठी सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे हे आहे. भविष्यात हा महत्त्वाचा मार्ग पुन्हा कधीही 'ब्लॅक स्पॉट' बनू नये, याची दखल घेण्यात आली आहे. देशासाठी हा महामार्ग सुरक्षेचे एक अनुकरणीय मॉडेल आहे. जंगली क्षेत्रातून जाणारा आणि डोंगर कापून बांधलेला हा रस्ता तीव्र वळणांचा आहे. यावर उपाय म्हणून 'स्पीड डिटेक्टर' बसवण्यात आले आहेत आणि रस्त्याला लाल रंग देण्यात आला आहे. त्याला 'टेबलटॉप रेड मार्किंग' म्हणतात. ते दुरून सुंदर दिसते पण लाल रंग पाहून चालक वेग कमी करतात. त्यामुळे या भागात अपघातांचा धोका कमी होतो. सध्या हा रस्ता त्याच्या सौंदर्यामुळे आणि चालकांसाठी सुरक्षिततेमुळे चर्चेत आहे. अलिकडेच झालेल्या एका अपघातात चित्याच्या पिल्लाचा मृत्यू झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. रस्त्याच्या कडेला कुंपण घालण्यात आले आहे. वेग मोजणारी उपकरणे बसवण्यात आली आहेत. हे सर्व मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने आहे.

रस्ते बांधणीसोबतच प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे. भोपाळ-जबलपूर महामार्गावर सुरू करण्यात आलेले हे 'रेड टेबल टॉप मार्किंग' भारतातील रस्ते सुरक्षा आणि वन्यजीव संवर्धनासाठी एक नवीन उदाहरण ठरू शकते. हा लाल रस्ता 'स्पीड ब्रेकर'पेक्षा वेगळा आहे. तो सामान्य स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिपसारखा नाही. तो थोडा उंचावलेला आहे आणि दुरून स्पष्टपणे दिसतो. असे असले, तरी अनेक लोकांना भीती वाटते, की वेगळ्या रंगाचा रस्ता 'एडीएएस' प्रणालीला गोंधळात टाकू शकतो; परंतु तज्ज्ञ म्हणतात, की आधुनिक 'एडीएएस' केवळ रंगावर अवलंबून नाही. ते रस्त्याच्या कडा, कॉन्ट्रास्ट, रिफ्लेक्टिव्हिटी आणि कॅमेरे, रडार आणि लिडारसारख्या सेन्सरमधून माहिती घेते. हा लाल रस्ता दुबईच्या शेख झायेद रस्त्याचे अनुकरण आहे. शेख झायेद रस्त्यावर विशिष्ट भागात स्पष्ट रंगीत खुणा आहेत. त्यामुळे अपघात कमी झाले आहेत. भारतातील या प्रयोगातून रस्ते आता केवळ वाहनांसाठीच नव्हे तर मानव, प्राणी आणि पर्यावरण लक्षात घेऊन बांधले जात आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मते, हा प्रकल्प पर्यावरण मित्रत्व, सार्वजनिक सुरक्षा आणि वन्यजीव संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे लाल रस्ता धोक्याचे नव्हे, तर बुद्धिमान डिझाईनचे प्रतीक ठरत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

### गिरीश शेरेकर

# युतीत बिघाडी, आघाडीत थोडा समन्वय

अमरावती महानगरपालिकेच्या रणधुमाळीतला महत्त्वाचा टप्पा मंगळवारी पूर्ण झाला. महायुती व महाविकास आघाडीत निवडणूक लढविण्याच्या वल्गना करणाऱ्या सर्वच पक्षांनी आपल्या सोयीनुसार जागावाटप करून एकमेकांना धक्के दिले. काही ठिकाणी उमेदवारांची आयात व निर्यात झाली. गेल्या दोन दिवसांपासून अत्यंत हायहोल्टेज ड्रामा अमरावतीत सुरू होता. सर्वांत जास्त गोंधळ महायुतीत पाहायला मिळाला. शेवटच्या क्षणापर्यंत भाजपा व शिवसेनेची चर्चा सुरू होती. अखेर दोन्ही पक्षांनी वेगवेगळे लढण्याचा निर्णय घेतला. युतीतला आणखी एक मित्रपक्ष युवा स्वाभिमानला भाजपाने सोबत घेतले. पण, त्यांना फक्त आठच जागा दिल्याने त्यांनी जास्तीचे उमेदवार मैदानात उतरविले आहेत. शिवसेनेने भाजपाने उमेदवारी नाकारलेल्या अनेकांना वेळेवर उमेदवार बनवले. काहींना युवा स्वाभिमानने दिल्या आहेत. दुसरीकडे काँग्रेसने नावापुरत्या काही जागा मित्रपक्ष उबाठाला सोडल्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वच जागांवर उमेदवार दिले आहे. युतीत बिघाडी पाहायला मिळाली तर आघाडीत काही प्रमाणात समन्वय दिसला.

महापालिका निवडणूक महायुतीतले व महाविकास आघाडीतले पक्ष एकत्र लढतात की वेगवेगळे याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सर्वांत जास्त घडामोड महायुतीत होती. शिवसेनेने भाजपाला ३५ जागांचा प्रस्ताव दिला होता. तो नाकारून भाजपाने फक्त ११ जागा देण्याची तयारी दर्शविली होती. त्यांनी तो प्रस्ताव नाकारून वेगळी भूमिका घेण्याची तयारी केली असतानाच त्यांना थांबविण्यात आले. स्थानिक व वरिष्ठस्तरावर चर्चा झाल्यानंतर अखेर शिवसेनेला १६ जागा देण्याचे जवळपास निश्चित झाले होते. पण, त्यांनी १६ प्रभागात प्रत्येकी एक उमेदवार शिवसेनेचा राहील ही अट घातली. भाजपाने ती अमान्य केली. जेथे आमचे उमेदवार विजयी झाले, तेथील एकही जागा आम्ही देणार नाही, अशी भूमिका भाजपाने घेतली. नेमके याच मुद्यावरून भाजपा व सेनेत ठिणगी पडली आणि युती मोडली. भाजपाचे निवडणूक निरीक्षक संजय कुटे यांनी शेवटपर्यंत युती कायम राहील असा प्रयत्न केला. पण, भाजपातल्या अनेकांना सेनेसोबत युती नकोच होती. कारण, गेल्या निवडणुकीत भाजपाने ७४ जागा लढल्या व ४५ जिंकल्या. युतीत शिवसेनेला व युवा स्वाभिमानला २४ जागा दिल्यावर भाजपाकडे फक्त ५० जागाच शिल्लक राहणार होत्या. इतक्या कमी जागेत भाजपाला गेल्या निवडणुकीतली कामगिरी कायम राखता आली नसती. त्यामुळे भाजापाने सेनेसोबतची युती मोडून फक्त युवा स्वाभिमानला ८ जागा देऊन त्यांच्यासोबत युती केली. आता ६७ जागा भाजपा लढणार आहे. युवा स्वाभिमानने सध्या तरी ४१ जागांवर उमेदवार उभे केले. भाजपाने सुद्धा स्वाभिमानला दिलेल्या ८ जागांवर आपले उमेदवार अपक्ष म्हणून उतरविले आहे. स्वाभिमानने जास्तीचे उमेदवार मागे घेतले नाही तर भाजपाने अपक्ष म्हणून उतरविले उमेदवार मैदानात कायम राहतील. त्यावरून असे लक्षात येते की, भाजपाची युवा स्वाभिमानसोबत युती राहील की नाही? असा प्रश्न आता चर्चेला आला आहे. तुलनेने महाविकास आघाडीत कुठेही कुरबुर झाली नाही. काँग्रेस व उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार व अन्य छोट्या पक्षांनी समन्वयाने मार्ग काढला. काँग्रेस ७४ जागा लढविणार आहे. अन्य ठिकाणी सहकारी पक्षांसाठी त्यांनी जागा सोडल्या तर काही ठिकाणी ते मैत्रीपूर्ण लढणार आहे.

या सर्व गदारोळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शांत होता. 'एकला चलो रे'च्या भूमिकेवर कायम राहत कुठेही गाजावाजा न करता जवळपास ८२ ठिकाणी त्यांनी उमेदवार दिले आहेत. सांगायचा मुद्दा इतकाच की, सर्व पक्षांनी आपले उमेदवार मैदानात उतरवले आहे. अर्जाची छाननी व अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर प्रत्येक प्रभागातले अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. प्रत्येक प्रभाग आपल्या पक्षासाठी अनुकूल राहावा यासाठी येत्या दोन दिवसांत सर्वच प्रमुख पक्षांकडून प्रयत्न होणार आहे. इतर सर्व पक्षांच्या तुलनेत भाजपासाठी ही निवडणूक आव्हानात्मक आहे. शिवसेना स्वतंत्र लढत असल्याने मतविभागणी होऊन भाजपाला फटका बसेल का? याचे उत्तर सध्या तरी कोणाकडे नाही. गेल्या निवडणुकीत शिवसेना स्वतंत्रच लढली होती आणि त्यांचे ७ उमेदवार विजयी झाले होते. यंदा तर शिवसेनाच दुभंगल्याने त्यांच्याही अडचणी आहे. युवा स्वाभिमान व भाजपाची युती कोणते वळण घेते यावर काही प्रभागतली समीकरणे अवलंबून आहेत. यंदा नव्याने तयार झालेला राष्ट्रवादी अजित पवार पक्ष संपूर्ण ताकदीने उतरला असल्याने, त्याचा फटका नेमका कोणाला बसेल यावर चर्चा होत आहे. एकंदरीतच निवडणुकीत चांगलीच चुरस पाहायला मिळणार आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

### प्रा. दिलीप जोशी

# नृसिंह पुराण

महर्षी व्यासांनी मूळ अठरा पुराणांची रचना केली. तशीच त्यांनी अठरा उपपुराणेही लिहिलीत. नृसिंह पुराण या अठरा उपपुराणातील एक उपपुराण आहे. पुराण आणि दशावताराची सांगड व्हावी म्हणून आतापर्यंत पाहिलेल्या भगवान विष्णूंच्या अवतारमालिकेतील पुढील अवतार म्हणजे भगवान नृसिंह. हा अवतार समजून घेण्यासाठी या उपपुराणाला मुद्दाम हात घातला. नृसिंह पुराणात साहजिकच भगवान विष्णूंच्या नृसिंह अवताराची चर्चा असणे क्रमप्राप्त आहे. नृसिंह पुराणात एकूण अडुसष्ठ अध्याय असून तीन हजार चारशे चौसष्ट श्लोक आहेत. नृसिंह अवतार हा अर्धमनुष्य अर्ध पशू असा अवतार आहे. या आधीचे तीन अवतार मनुष्येतर आहेत. त्यामुळे हा अवतार नरपशू असल्याने त्याचे विशेष महत्त्व आहे. नृसिंह पुराणात भगवान नृसिंह अवताराबद्दलचा कथाभाग अध्याय ४० च्या पुढे असला तरी अवताराचे माहात्म्य प्रारंभापासूनच आहे. प्रारंभीच भरद्वाज मुनी सुत महाशयांना नृसिंह पुराण सांगण्याची विनंती करतात.

**सांप्रतं नारसिंहाख्याम् त्वतः पौराणसंहिताम् ।**
**श्रोतुमिच्छाम्यहं सूत श्रोतुकामा इमे स्थिताः ॥**

त्यानुसार ते हे पुराण सांगतात.

सुत महामुनी भरद्वाज संवादात अनेक विषय आहेत.

ब्रह्मदेवाचे आयुष्य आणि कालगणना, दक्षप्रजापती यांचा जीवनवृत्तांत, मार्कंडेय महामुनींचे जीवनचरित्र, त्यांचा मृत्यूवरील विजय, महामृत्युंजय स्तोत्र, यम संवाद, यमगीता, यम आणि यमाची बहीण यमी यांचा संवाद, ''ॐ नमो नारायणाय'' या अष्टाक्षरी मंत्राचा महिमा, विश्वकर्मा द्वारा सूर्यस्तुती, विविध वंश वर्णन, शांतनू चरित्र, धृव चरित्र, भगवंताचे दशावतार जसे मत्स्य, कच्छ, वराह, परशुराम असे दहाही अवतार यांचे संक्षेपात चरित्र या पुराणात आहे. त्यातील नृसिंह अवतारासोबतच भगवान रामचंद्राचे विस्तृत चरित्र यात आहे. भगवान श्रीकृष्ण चरित्रही अंशतः आहे.

नृसिंह अवताराचे विश्लेषण करताना अध्याय ४० ते अध्याय ४४ पर्यंत नृसिंह भगवंताची अवतार कथा सांगतात. यात राजा सहस्रानिक भृगु ऋषींना भगवान विष्णूंच्या अवतार कथा सांगण्याची विनंती करतात तेव्हा भृगु ऋषी मार्कंडेय महामुनींना कथा सांगण्याची सूचना करतात. त्यामुळे या पुराणात प्रारंभी राजा सहस्रानिक आणि भृगु ऋषी संवाद आहे. त्यानंतर दशावतार सांगताना सहस्रानिक आणि मार्कंडेय संवाद आहे. तो असा-

सनतकुमारांच्या शापाने जय आणि विजय दैत्यकुळात जन्म घेतात. त्यातील विजय हिरण्यकश्यपू रूपात जन्म घेतात. हिरण्यकश्यपूने ब्रह्मदेवाची सहस्र वर्ष निराहार उपासना आणि घोर तपश्चर्या केल्यामुळे त्याला ब्रह्मदेवांकडून वरदान प्राप्त होते की त्याचा मृत्यू ना शस्त्राने ना अस्त्राने, ना मानव ना पशू, ना दिवसा ना रात्री, ना आत ना बाहेर, ना आकाशात ना जमिनीवर होऊ नये म्हणून अशा अनेक अशक्य बाबी वरदान म्हणून त्याने ब्रह्मदेवाला मागितल्या आणि देवाने त्याला त्या दिल्या. त्या वराने हिरण्यकश्यपू नावाचा दैत्य उन्मत्त झाला. स्वतःलाच देव समजू लागला. प्रजेलाही त्याने देव पूजा नाही तर स्वतःचीच पूजा करण्याच्या सूचना दिल्यात. सर्वत्र अराजक माजू लागले. यामुळे भीतिपोटी देवराज इंद्राने देवगुरू बृहस्पतींना हिरण्यकश्यपूच्या वधाचा उपाय विचारल्यावर सर्व देवगण भगवान महादेवासह भगवान विष्णूंकडे गेले. तेथे गेल्यावर भगवान विष्णूंनी सर्वांना भयमुक्त करण्याचे वचन दिले आणि सांगितले की हिरण्यकश्यपूच्या पोटी प्रल्हाद नावाचा पुत्र जन्माला येईल. त्याच्या योगाने या दैत्याचा वध मी करेन. इकडे हिरण्यकश्यपूने पुन्हा तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. त्याचे आप्तगण त्याला म्हणू लागले की आपण त्रिभुवनाचे स्वामी. आता अजून काय हव ? तपश्चर्या नको आता. पण त्याने ऐकले नाही. काही हितकारी लोकांना घेऊन तो तप करू लागला. त्यामुळे देवगण चिंताग्रस्त झाले. त्यांनी ब्रह्मदेवांजवळ जाऊन चिंता व्यक्त केली. ब्रह्मदेवही काळजीत पडले तेव्हा देवर्षी नारदांनी मी तपश्चर्येत बाधा निर्माण करतो असे सांगून नारदमुनींनी त्यांच्या सोबत पर्वतमुनींना घेतले. दोघांनीही पक्ष्याचे रूप घेतले. जिथे हिरण्यकश्यपू तपश्चर्या करीत होता त्या ठिकाणी झाडावर बसून ॐ नमो नारायणाचा जप मोठ्या आवाजात करू लागले. त्यामुळे हिरण्यकश्यपूची तपश्चर्या भंग होऊन तो क्रोधित झाला. तो आसन सोडून पक्ष्यांच्या मागे लागला. तपश्चर्या भंग झाल्याने देवांचे संकट टळले. आता तो दैत्य घरी परत आला. त्यांनतर त्याची पत्नी कयाधू गर्भवती झाली. गर्भात असताना त्याच्यावर देवर्षी नारदाच्या आश्रमात राहण्याचा योग आला. त्या आश्रमातील दैवी संस्काराने तो प्रल्हाद वैष्णव झाला.

ही बाब स्वतः प्रल्हादांनी त्यांचे गुरू शांड आणि अमर्क यांना सांगितली.

**विष्णुभक्त्या प्रमुच्याथ गतः स्वं भुवनं हरिः ।**
**नारदस्तां समानिय आश्रमं स्वं शुभव्रतः ॥**

हे नृसिंह पुराणात विदित आहे. आपला पुत्र विष्णूंची आराधना करतो हे पाहून दैत्यराज हिरण्यकश्यपूने त्याला समजावून सांगण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला पण प्रल्हादावर काहीच परिणाम होत नाही हे पाहून त्याला मारून टाकण्याचा त्याने आदेश दिला. अनेक क्रूर प्रयत्न करूनही त्याला मारण्यात यश येत नाही हे पाहून एक दिवस चिडून त्याने कुठे आहे तुझा विष्णू? या खांबात आहे का?

**त्वयोक्तं स हि सर्वत्र, कस्मात्स्तंभे न दृश्यते ।**
**यदि पश्यामि तं विष्णुमधुना स्तंभमध्यगाम् ॥**

विचारल्यावर स्वयं नारायण नृसिंह रूपात प्रकट झालेत. दैत्याला मिळालेल्या वरदानाच्या सर्व अटी अबाधित ठेवून भगवान नृसिंहांनी हिरण्यकश्यपूचा वध केला. कथा सर्वांना माहीत आहे. आजही ही कथा सांप्रत स्थितीत आपल्यासाठी लागू पडते. सध्याही अनेक हिरण्यकश्यपू भारत आणि भारतीय संस्कृतीवर आघात करीत आहेत. भारतीय समाज मात्र खांबासारखा स्तब्ध आहे. संघासारख्या अनेक संघटना प्रल्हाद बनून जागरण करीत आहेत. खांबासारख्या निष्क्रिय नरांमधून सिंह जागृत व्हावा आणि सारा समाज नृसिंह बनावा. हिरण्यकश्यपूचा वध करून इथे ईश्वराचे रामराज्य निर्माण व्हावे. हाच या पुराणाचा आतासाठी संदेश आहे. भगवान नृसिंह अनेकांचे कुलदैवत आहे. उग्ररूप धारण केलेल्या नृसिंह भगवंताची आराधना घोर संकटातून मुक्त करते. या शिवाय शत्रूमध्ये असलेला शत्रुभाव नष्ट करण्याचे सामर्थ्य नृसिंह मंत्रात आहे.

**ॐ उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम् ।**
**नृसिंहं भीषणं भद्रं मृत्युं मृत्युं नमाम्यहम् ॥**

९८२२२६२७३५

## राज्यात मनपा निवडणुकीचा रंग

सध्या संपूर्ण राज्यभरात मनपा निवडणुकीचा रंग चढलाय. विविध राजकीय पक्ष व उमेदवार चांगलेच कामाला लागलेले दिसताहेत. आधी तिकीट मिळावे म्हणून देव पाण्यात ठेवणारे आणि आता १६ तारखेच्या निकालात आपलाच विजय व्हावा म्हणून देव पाण्यात ठेवणारे उमेदवार मतप्राप्तीसाठी आता पुढील पंधरा दिवस दारोदारी फिरताना दिसतील. मतांचं पारडं भरण्यासाठी ताई, माई, अक्कांना आपलंसं केलं जाईल, खऱ्या-खोट्या आश्वासनाची यादी वाचली जाईल, अनेक दिग्गजांच्या सभा होतील, कॉर्नर मीटिंग्ज होतील, जेवणावळी-अल्पोपाहारही होतील.

अर्थात या साऱ्या गोष्टी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेत व्हाव्यात हेच अपेक्षित आहे. एक काळ असाही होता जेव्हा मतदारांना विविध प्रलोभने दाखवून मत विकत घेण्याचे प्रयत्न व्हायचे. निवडणुकीच्या काळात ''मूठभर चिवडा, घोटभर दारू जो देईल त्यावर शिक्का मारू'' ही म्हण प्रचलित असायची. आज काळ बदलला, मतदार राजा सुज्ञ झाला. काय चांगले काय वाईट हे त्यालाही कळायला लागले. लोकशाहीची पवित्र मूल्ये जपण्यासाठी तो पुढे सरसावला. पण समाजात कुठे ना कुठे ही वाईट प्रवृत्ती डोके वर काढतेच, तेव्हा तिला दाबण्याचाही प्रयत्न एक सुज्ञ नागरिक म्हणून आपलीही तेवढीच जबाबदारी आहे. लोकशाहीच्या या उत्सवात मतदान पारदर्शक, प्रलोभनविरहित तसेच विक्रमी म्हणजे मोठ्या संख्येने व्हावे यासाठी आपण सर्वांनी आपापल्यापरीने नक्की प्रयत्न करूया आणि आपल्या देशातील लोकशाही अधिक बळकट करूया...

**अखिल देशपांडे**/अकोला

## वाचक पत्रे

### नवीन वर्ष समृद्धीचे जावो

जुने वर्ष संपून नवीन वर्ष येते तेव्हा वेळेच्या दारावर अलगद टिकटिक आवाज होतो. ''मी आलो आहे'' असे जणू ते हळूच कानात सांगते. जुन्या वर्षाच्या पायऱ्या ओलांडून ते आपल्या जीवनात प्रवेश करते आणि मनात नकळत नवे विचार, नवी उमेद जागवते. कॅलेंडरवरची तारीख बदलते, पण त्या बदलासोबत मनाच्या कोपऱ्यात काहीतरी नव्याने उमलू लागते. जुन्या वर्षाच्या आठवणीत मन रमून जाते. सुख-दुःखाचे कडू-गोड प्रसंग पुन्हा एकदा डोळ्यासमोर तरळू लागतात. त्या सर्व आठवणी म्हणजे रंगीबेरंगी चित्रांसारख्या असतात. काही आनंदाच्या, काही दुःखाच्या, तर काही शिकवण देणाऱ्या. त्या आठवणी मनाच्या कप्प्यात नीट जपून ठेवून पुढे जाण्याचे धैर्य नवीन वर्ष देते. ते आपल्याला सांगते की भूतकाळ विसरायचा नाही, पण त्यात अडकून देखील राहायचे नाही.

तशी तर रोजच्या सारखी पहाट होते पण आज नवीन वर्षाची पहाट ही खास असते. वातावरणात एक वेगळाच ताजेपणा जाणवतो. हिवाळाच्या थंड वाऱ्यासोबत आशेची चाहूल लागते. मनात नकळत विचार येतात की, या वर्षी काहीतरी वेगळं करूया, काहीतरी चांगलं घडवूया. मग संकल्प जन्माला येतात, काही ठाम असतात तर काही हळवे असतात. ते संकल्प कधी पूर्ण होतात, कधी वाटेत हरवतात, पण प्रयत्न करण्याची प्रेरणा मात्र कायम देऊन जातात. शेवटी नवीन वर्ष आपल्याला एवढेच सांगते की, मी फक्त एक सुरुवात आहे.

### वंदेभारतमधील एलईडी दिवे धोकादायक

वंदेभारत एक्सप्रेसमधील प्रखर पांढऱ्या LED प्रकाशामुळे प्रकाशप्रदूषण, झोप न लागणे व दुसऱ्या दिवशी आरोग्य अस्वस्थता होते. विमानासारखे रात्री ८नंतर प्रकाश मंद/बंद करावे. कोणतेही स्टेशन येण्याअगोदर ५-१० मिनिटेच चालू ठेवावे ही विनंती. (Ref. JwJbda white room torture gM© H$amdo.)

**प्रशांत महिंद्रकर, सोलापूर.**

## आजचे संघगीत-८९

बुधवार, ३१ डिसेंबर २०२५

### आव्हान द्यावया आम्हा कुणाची छाती?

आव्हान द्यावया आम्हा कुणाची छाती ?
दश-दिशांत अमुच्या सामर्थ्याची ख्याती ॥धृ॥

कैलासी अजुनी जागा तांडव राग, सागरी धगधगे वडवाग्नीची आग
मंत्रात शांतिच्या इथे जागते क्रांती ॥१॥

नगराज हिमालय उन्नत अमुचा माथा, इतिहास गातसे पुरुषार्थाची गाथा
प्रसवते वीरता कण कण इथली माती ॥२॥

आसेतु हिमाचल एक आमुचा देश, ही एक संस्कृती एकच दे संदेश
भारतीय रुधिरें जडली अमुची नाती ॥३॥

सुमकोमल आणि कठिण वज्रही आम्ही, खलसंहारास्तव होऊ रुद्रहि आम्ही
खड्गापरि कणखर इथे तृणांची पाती ॥४॥

ही असे अनादी, अनंत अमुची माता, हो धन्य वेदही हिचीच महती गाता
जगजननीची या कीर्ति देवही गाती ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट ब संयुक्त पूर्व परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट व अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकुण १६ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत एक सत्रात घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेसाठी एकूण ४६५९ उमेदवार बसलेले असून सदर परिक्षा सुरळीत पार पाडणेकरीता १६ उपकेंद्रप्रमुख, ३३ मदतनीस, ७२ पर्यवेक्षक, २३० समवेक्षक असे एकूण ३५१ अधिकारी कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाव्दारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना दिनांक २४.१२.२०२५ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा केंद्रप्रमुख यांनी सदर परिक्षेचे अनुषंगाने प्रशिक्षण दिले.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणाताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परीसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

मा. आयोगाच्या सूचनेनुसार सदर परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा /अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे.

दोन पेपरच्या मधल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास सक्त मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे केवळ आवश्यक साहित्य उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील, तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणेबाबत याव्दारे सूचित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजे नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## निर्लेखित साहित्याचा लिलाव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

जिल्हा व सत्र न्यायालय, बीड या कार्यालयातील निर्लेखीत करावयाच्या फर्निचर / जडवस्तु तसेच निररूपयोगी वस्तुंची जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे.

हा जाहिर लिलाव दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता नवीन जिल्हा न्यायालय इमारतीच्या आवारात (प्रवेशव्दारा समोर) ठेवण्यात आलेला आहे. तसेच विक्री करावयाचे साहित्य / जडवस्तु दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत पाहता येईल. इच्छूक खरेदीदारांनी इतर सविस्तर अटी व शर्तीच्या माहिती करीता रूम नं. ३०९, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, बीड येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक यांनी केले आहे.

# चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास भेट



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ डिसेंबर**

तालुक्यातील चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ३१ डिसेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास शैक्षणिक भेट दिली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे तसेच नवकल्पनांची ओळख करून देणे हा होता.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली शास्त्रीय मॉडेल्स, प्रयोग व प्रकल्प मांडण्यात आले होते. ऊर्जा संवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन, आरोग्य व तंत्रज्ञान या विषयांवरील प्रकल्पांनी विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी हे सर्व प्रकल्प उत्सुकतेने पाहिले व संबंधित विद्यार्थ्यांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना प्रत्येक प्रकल्पाचे शास्त्रीय महत्त्व समजावून सांगितले.

# केज रोटरीच्या अध्यक्षपदी असरार कुरेशी तर सचिवपदी हनुमंत भोसले

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३१ डिसेंबर**

रोटरी क्लब ऑफ केजच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध व्यवसायिक असरार कुरेशी तर सचिव पदी संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांची निवड करण्यात आली आहे.

केज येथील रोटरी क्लब ची स्थापना २००५ साली झालेली असून गेली २० वर्षापासून क्लब च्या वतीने केज शहरात विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. आजपर्यंत सर्वच अध्यक्षांच्या कार्यकाळात शहरात व परिसरात केज रोटरीच्या वतीने उत्कृष्ट कार्य पार पाडले गेले आहे.



रोटरी या अंतरराष्ट्रीय सामाजिक संस्थेत प्रत्येक अध्यक्ष व सचिव यांना ०१जुलै ते ३० जून असा फक्त एक वर्षाचा कार्यकाळ निश्चित केलेला आहे. केज रोटरीच्या २०२५ - २०२६ वर्षासाठी विद्यमान अध्यक्ष सत्यवान राऊत व सचिव प्रवीण देशपांडे हे कार्यरत आहेत. क्लब ने २०२६ - २०२७ या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून केज येथील प्रसिद्ध उद्योजक असरार कुरेशी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. आपल्या कार्यकाळात केज शहर व परिसरात केज रोटरीचे जास्तीत जास्त कार्य करण्याचा निर्धार भावी अध्यक्ष असरार कुरेशी यांनी व्यक्त केला आहे. या काळात अनेक समाजोपयोगी कार्य करून केज रोटरी चे नांव उंचावू असे म्हणाले. या काळात केज रोटरीचे सचिव म्हणून क्लब चे संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले हे काम पाहणार आहेत. या निवडीबद्दल अध्यक्ष व सचिव यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहेत.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयास प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षणात विद्यापीठाकडून 'अ प्लस' दर्जा प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ डिसेंबर**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षणामधील सर्वच निकषांमध्ये महाविद्यालयास ३९५ गुण (८७.७७ टक्के) देऊन 'अ प्लस' दर्जा दिला आहे.



अंकेक्षण प्रकियेत महविद्यालयातील अभ्यास नियोजन, अध्ययन, अध्यापन व मुल्यमापन पध्दती, संशोधन व नवोउपक्रम, पायाभुत सुविधा, विद्यार्थी सहाय्यता, प्रशासन व नेतृत्व आणि गुणवता या सातही निकषावर महाविद्यालयाची सखोल तपासणी करण्यात आली. सर्वच निकषामध्ये महाविद्यालयाची कामगिरी समाधानकारक व दर्जेदार आढळून आल्याने विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षण (---) समितीने महाविद्यालयास 'अ प्लस' दर्जा प्रदान केला आहे.

सुसज्ज ग्रंथालय, आय सी टी सुविधांचा प्रभावी वापर, संशोधनास प्रोत्साहन, विविध अभ्यासपूर्वक व सामाजिक उपक्रम राबवले जातात. तसेच प्रशासनात पारदर्शकता, नियोजनबध्द कार्यपध्दती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून सातत्याने गुणवत्ता वाढीचे उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयाच्या उल्लेखनीय यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह ऍड. बी.आर.डक यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ.एन. के.मुळे, उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, अंकेक्षण समितीचे समन्वयक डॉ. अरुण पेंटावार, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांच्यासह प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# कै. दत्ताजी भाले स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी शिवव्याख्याता व दुर्गभ्रमंतीकार मा. डॉ. शिवरत्न शेटे (सोलापूर) यांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्फूर्तीदायक जीवन चरित्र या विषयावर व्याख्यान पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृह अंबड येथे आयोजित केले आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री वेंकटेश गोसावी असणार आहे तर प्रमुख अतिथी म्हणून बदनापूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार श्री नारायण कुचे उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ. हेमंतजी वैद्य (कार्यवाह, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई), सौ. ज्योती भाभी ठाकूर (उपाध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आंबेजोगाई), डॉ. विष्णू सोनवणे (संयोजक, रा. स्व. संघ शताब्दी वर्ष समिती तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य भाशिप्र) असणार आहे.याच कार्यक्रमात अंबड शहरातील नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी शिशु वाटिका , प्राथमिक व माध्यमिक विभागाचा सांस्कृतिक कार्यक्रम पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात होणार आहे.

या दोन्ही कार्यक्रमाला अंबड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कै. दत्ताजी शैक्षणिक संकुलाचे सर्व पदाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांचा आज पदग्रहण समारंभ

**नागरिकांनी उपस्थित राहावे – सुशिल जवंजाळ यांनी केले आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**



गेवराई नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीता भाभी बाळराजे पवार यांच्या पदग्रहण समारंभाचे आयोजन गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नगर परिषद कार्यालय, गेवराई येथे करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ यांनी केले आहे.

हा पदग्रहण समारंभ गेवराई नगरपरिषदेच्या लोकशाही परंपरेतील एक महत्त्वाचा व ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. या कार्यक्रमासाठी माजी मंत्री बदामराव पंडित, भाजप नेते बाळराजे पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सौ. पवार गुरुवारी नगराध्यक्षपदाची अधिकृत सूत्रे स्वीकारतील. शहराच्या विकासासाठी पायाभूत सुविधा, शहरातील स्वच्छता , पाणीपुरवठा , रस्ते विकास, तसेच विविध योजनांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पदग्रहण समारंभानिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण असून, या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक, नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवार रोजी योगिराज महाराज रामगडकर यांचे कीर्तन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील पाचव्या पुण्यतिथी पौष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.स्वामी योगिराज महाराज यांचे शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी काळेगांव ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# 'डिजिटल अरेस्ट' आणि 'ओटीपी' स्कॅमपासून सावधान!

**सोलापूर सायबर सेलचे नागरिकांना आवाहन**





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.३१ डिसेंबर**

ऑनलाइन व्यवहारांच्या वाढत्या व्यापासोबतच सायबर भामट्यांच्या जाळ्यापासून नागरिकांना वाचवण्यासाठी सोलापूर सायबर क्राईम सेल आणि बजाज फायनान्स लिमिटेड सरसावले असून देशातील १०० शहरांमध्ये राबविल्या जाणाऱ्या सायबर सुरक्षा उपक्रमाचा एक भाग म्हणून सोलापुरात 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' ही जनजागृती मोहीम राबवण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजीत शाह, सायबर क्राईम अधिकारी प्रांजली काळे, अश्विनी लोणी, सेवानिवृत्त एसीपी सुरेश घाडगे आणि बजाज फायनान्सचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथे आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संबोधित करताना, सोलापूर सायबर क्राईमचे पी.आय. श्री. श्रीशैल गजा यांनी सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या प्रमाणावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, बहुतेक सायबर घोटाळे हे तंत्रज्ञानाच्या ज्ञानाचा अभाव आणि जलद नफा मिळवण्याच्या लोभामुळे होतात. बनावट नोकरीच्या ऑफर, मोफत सुट्ट्यांच्या सहली आणि भेटवस्तूंच्या अमिषाला बळी पडू नका. असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमात वक्त्यांनी सध्या प्रचलित असलेल्या विविध फसवणुकीच्या प्रकारांची माहिती दिली. यात प्रामुख्याने डिजिटल अरेस्ट, पोलीस किंवा तपास यंत्रणेचे नाव सांगून भीती दाखवणे, बनावट ओटीपी स्कॅम, बँकेचे अधिकारी असल्याचे भासवून ओटीपी विचारणे, सोशल मीडिया स्कॅम, कंपन्यांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या बनावट वेबसाईट आणि व्हॉट्सप ग्रुप्सद्वारे गुंतवणूक करण्यास भाग पाडणे अशा फसवणुकीचा समावेश आहे. हा उपक्रम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४ च्या 'फसवणूक जोखीम व्यवस्थापन' मार्गदर्शक तत्त्वांनुसार राबवला जात आहे. बजाज फायनान्सच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ग्राहकांची आर्थिक सुरक्षा हीच आमची प्राथमिकता असून, संशयास्पद लिंक्स, क्यूआर कोड्स आणि अनोळखी प्सपासून दूर राहणे हेच सुरक्षिततेचे मुख्य सूत्र आहे. डिजिटल अरेस्ट' आणि 'ओटीपी' स्कॅमपासून नागरिकांनी सावध रहावे असे ते यावेळी म्हणाले.

# बीड शहर विकास आघाडीच्या गटनेतेपदी खुर्शीद आलम

## निर्वाचित नगरसेवकांनी एकमुखाने केली निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांच्या निर्वाचित सदस्यांकडून बीड शहर विकास आघाडीची स्थापना करण्यात आली असुन, गटनेते पदी खुर्शीद आलम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पक्षाशी एकनिष्ठ आणि विकासासाठी संघर्षशील असलेले कार्यकर्ते खुर्शीद आलम यांना यामाध्यमातुन न्याय मिळाला आहे.



बीड नगरपरिषद निवडणुक २०२५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे हे दोन्ही पक्ष एकत्र मिळून लढले होते. त्यामध्ये या आघाडीकडून १३ उमेदवार निवडून आले आहेत. निवडून आलेल्या उमेदवारांनी बीड शहर विकास आघाडी स्थापन करून गटनेते पदी खुर्शीद आलम यांची एकमुखाने निवड केली. या संदर्भात बुधवार (दि.३१) रोजी राष्ट्रवादी भवन येथे बैठक पार पडली. या बैठकीत आ.संदिप क्षीरसागर, माजी.आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष उल्हास गिराम यांची प्रमुख उपस्थिती होती. गटनेते पदी निवडून आल्या बद्दल खुर्शीद आलम यांचे तसेच सर्व निर्वाचित नगर परिषद सदस्यांचे आ.संदिप क्षीरसागर माजी.आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य यशस्वी



**पैठण :** जि.प.प्रशाला गणोरी ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर येथे ५३व्या जिल्हास्तरिय विज्ञान प्रदर्शनात द्वितीय क्रमांक मिळवला. प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील ७० शाळांनी सहभाग नोंदवला होता .त्यामध्ये आर्य चाणक्य प्रा. विद्या मंदिर पैठणने उदयोन्मुख तंत्रज्ञान या विषया अंतर्गत शेतकरी व कामगार सुविधा यंत्र हा प्रोजेक्ट बनवला. शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या दृष्टीकोनातून आवश्यक असल्या कारणाने त्या दृष्टीक्षेपात एक पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला आहे. बक्षीस वितरण जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, शिक्षण विस्ताधिकारी माध्यमिक दिलीप शिरसाठ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या प्रयोगासाठी मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### एमजीएममध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठात महान भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन आर्यभट्ट सभागृह येथे एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाइड सायन्सेसच्या गणित व सांख्यिकी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमात इंस्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, जालना येथील प्रा. डॉ.संदिप बहिरट यांनी गणितातील संशोधन, आधुनिक विज्ञानातील गणिताचे महत्त्व आणि त्याचे व्यावहारिक उपयोग या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमास प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व सर्व संबंधित मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणित हा केवळ अभ्यासाचा विषय नसून वैज्ञानिक संशोधन आणि दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी एक प्रभावी साधन आहे, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा मुख्य उद्देश होता. प्रास्ताविक डॉ.उत्तरा देशमुख यांनी केले तर आभार मैजबीन पठाण यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ.के.एम.जाधव, डॉ.टी.एस.पवार, प्रा.एस.के.काळे, डॉ.फिरदौस खान, डॉ.आशा नाले यांनी विशेष परिश्रम घेतले.

### एक्सलंट पब्लिक इंग्लिश स्कूलमध्ये सपोर्ट डे

**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील एक्सलंट पब्लिक इंग्लिश स्कूल मध्ये आज स्पोर्ट डे आयोजन करण्यात आले. स्पोर्ट डे चे उदघाटन संघर्ष कॅडमीचे संचालक रवी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी मेजर ध्यानचंद जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून प्रतिमा पुजन केले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### शामसुंदर तोतला यांचे निधन



**बिडकीन :** शामसुंदर भिकचंद तोतला वय ५८ यांचे दि ३० डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मारवाडी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ असा परिवार आहे. माजी ग्रा.पं. सदस्य दिनेश तोतला यांचे बंधू होते.

# भाजपातर्फे प्रभाग २६ मधून सविता कुलकर्णी यांना उमेदवारी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर , ३१ डिसेंबर २०२५ :** भारतीय जनता पार्टीने आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांची रणनीतिक मांडणी करत प्रभाग क्रमांक २६ मधून सविता रत्नाकर कुलकर्णी यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. त्या सर्वसाधारण महिला संवर्गातून निवडणूक लढवणार आहेत. पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर विचारपूर्वक घेतलेल्या या निर्णयामुळे प्रभागातील राजकीय समीकरणांना गती मिळाली असून, महिला नेतृत्वाला पुढे आणण्याच्या भाजपच्या धोरणात्मक दिशेचे हे स्पष्ट प्रतिबिंब मानले जात आहे. सौ. कुलकर्णी या सामाजिक कार्यात सक्रिय असून स्थानिक पातळीवरील विविध नागरी प्रश्नांवर त्यांचा ठोस सहभाग राहिला आहे.

उमेदवारी जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, येत्या काळात प्रभागात प्रचार यंत्रणा अधिक वेगाने कार्यान्वित करण्याचे संकेत पक्षाकडून देण्यात आले आहेत. स्थानिक विकास, मूलभूत सुविधा, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि नागरिकाभिमुख प्रशासन हे मुद्दे प्रचाराच्या केंद्रस्थानी राहणार असल्याचे पक्ष सूत्रांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या उमेदवारीमुळे प्रभाग क्रमांक २६ मधील निवडणूक लढत अधिक चुरशीची होण्याची शक्यता असून, भाजपने या जागेवर विजय मिळवण्यासाठी स्पष्ट रचना आखल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.



# नवीन वसाहत शाळेत विद्यार्थ्यांनी जोपासली पर्यावरणाची शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**कन्नड, ३१ डिसेंबर २०२५ :** विद्यार्थ्यांना पुस्तकांपुरते न ठेवता प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देण्याच्या उद्देशाने खातखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवीन वसाहत येथे परसबाग उपक्रम राबविण्यात आला असून या उपक्रमाला यश आले आहे.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आपुलकी निर्माण होत असून आरोग्यदायी जीवनशैलीची जाणीव वाढत आहे.शाळेच्या मोकळ्या आवारात शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतः परसबाग फुलवली आहे. या परसबागेत करडई, मुळे, पालक, मेथी, कोथिंबीर, आंबटचुका यांसह विविध भाजीपाला पिकांची लागवड करण्यात आली आहे. बी पेरणीपासून पाणी देणे, रोपांची निगा राखणे ते तयार झालेल्या भाज्यांची काढणी अशी सर्व कामे विद्यार्थ्यांनीच उत्साहात पार पाडली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्गसंवर्धनाचे धडे प्रत्यक्ष अनुभवातून मिळत असून श्रमाचे महत्त्व, जबाबदारीची भावना आणि सामूहिक कामाचे मूल्य रुजत आहे. विशेष म्हणजे या परसबागेतून मिळालेल्या सेंद्रिय भाज्यांचा उपयोग शाळेतील मध्यान्ह भोजनासाठी करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यासही हातभार लागत आहे.शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा धाटबळे यांनी सांगितले की, परसबाग उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असून शिक्षण अधिक जिवंत आणि उपयोगी बनत आहे. या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून स्वागत होत असून नवीन वसाहत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा हा उपक्रम इतर शाळांसाठी प्रेरणादायी आहे.

# 'राष्ट्रीय रस्ते सुरक्षा महिना'चा आजपासून होणार शुभारंभ

**: जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**अहिल्यानगर, ३१ डिसेंबर २०२५ :** देशभरातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय यंत्रणांच्या सहकार्याने १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत 'राष्ट्रीय रस्ते सुरक्षा महिना' साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या अभियानाबाबत दिलेल्या निर्देशानुसार ०१ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने रहदारी व वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती करणे, वाहनचालकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा व सुरक्षा शिबिरे आयोजित करणे, युवकांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत साक्षरता निर्माण करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमधून निबंध स्पर्धा, चित्रकला, पथनाट्ये आदी उपक्रमांचे आयोजन करणे व आरोग्य शिबिरे आयोजित करणे आदी उपक्रमांचा समावेश आहे. सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करावे व संपूर्ण जानेवारी महिन्यात चालणारे हे अभियान सर्वांनी मिळून यशस्वी करावे, असे आवाहन घार्गे यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा समारोप

**छत्रपती संभाजीनगर, दि.३१ डिसेंबर :** विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधन वृत्ती आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांची गरज आहे. त्यात सहभागी होणारे हे बाल वैज्ञानिक देशाची प्रगती साध्य करण्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज गणोरी ता. फुलंब्री येथे केले.

५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन जिल्हा परिषद प्रशाला गणोरी, तालुका फुलंब्री येथे पार पडले. समारोप व पारितोषिक वितरण समारंभाला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनास शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती अश्विनी लाठकर, उपशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा म्हेत्रे खैरनार, गटशिक्षणाधिकारी क्रांती धसवाडीकर, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राजेश महाजन, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक दिलीप सिरसाठ, श्रीमती सुनीता वाघ, माध्यमिक शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी, फुलंब्री तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांशी जिल्हाधिकाऱ्यांनी साधला संवाद

**छत्रपती संभाजीनगर, दि.३१ डिसेंबर :** भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचे पथक प्रशिक्षणाचा भाग म्हणून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहे.

या अधिकाऱ्यांच्या पथकाने आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची भेट घेतली.

जिल्हाप्रशासनाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकची प्रत देऊन त्यांचे स्वागत करण्यात आली.

या अधिकाऱ्यांशी जिल्हाधिकारी स्वामी यांनी संवाद साधत जिल्ह्यातील विविध प्रशासकीय उपक्रम तसेच जिल्ह्यातील औद्योगिक, ऐतिहासिक व पर्यटन विषयक बाबींची माहिती दिली.

## 'लाइटस्टाईलबाय पीएनजी' ची सारा तेंडुलकर नवीन ब्रँड ॲम्बेसेडर

**छत्रपती संभाजीनगर :** पीएनजी ज्वेलर्सच्या समकालीन व हलक्या वजनाच्या फाईन ज्वेलरी ब्रँड 'लाइटस्टाईल बाय पीएनजी' ने सारा तेंडुलकरला आपली ब्रँड म्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. 'लाइटस्टाईल बाय पीएनजी'च्या या निर्णयामुळे भारतातील नवीन पिढीतील दागिनेप्रेमी असलेल्याग्राहकांशी ब्रँडचे नाते अधिक दृढ करणे हा यामागील हेतू आहे. या सहयोगामुळे पीएनजी ज्वेलर्सच्या वारसागत ग्राहकांपासून भविष्यातील ग्राहकांपर्यंतचादुवा म्हणून 'लाइटस्टाईल'ची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

जवळपास दोनशे वर्षांचाविश्वास असलेल्या पीएनजी ज्वेलर्सच्या परंपरेसोबतच, 'लाइटस्टाईल बाय पीएनजी' हा ब्रँडपुढील पिढीसाठी आधुनिक रिटेल फॉरमॅट, समकालीन डिझाइन आणि ओम्नी-चॅनल अनुभवावर आधारित जाणीवपूर्वक उभारण्यात आला आहे.













# सत्ता असूनही भाजपचा नगर पालिका निवडणुकीत जिल्ह्यात दारूण पराभव

## चंद्रशेखर बावनकुळे पराभवाची कारण मीमांसा करणार का?

**संजय कुलकर्णी**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

केंद्रात, राज्यात आणि हिंगोली जिल्ह्यात सत्ता तसेच हिंगोली जिल्ह्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून भाजपची ओळख असतांना नुकत्याच झालेल्या नगर पालिका निवडणुकीत तीनही ठिकाणी भाजपचा दारूण पराभव झाला आहे. या पराभवाची कारण मीमांसा करून आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपला यश मिळवण्यासाठी मित्रपक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादीला चोख प्रत्युत्तर देण्याची गरज आहे. महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे आज जिल्हा दौऱ्यावर आहेत. नगरपालिका निवडणुकीत भाजपचे गणित कुठे चुकले याची कारण मीमांसा करणार का? तसेच आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत यश मिळण्यासाठी काय कानमंत्र कार्यकर्त्यांना देणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

नुकत्याच झालेल्या नगर पालिका निवडणुकीत हिंगोली नगर पालिकेत भाजपचे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर आणि आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी कोट्यावधीचा निधी राज्य व केंद्र शासनाकडून आणला. शहराचा चेहरामोहरा बदलला. शहरात रस्ते, भूमीगत गटारे, जलेश्वर तलाव सौंदर्यीकरण तसेच इतर विकास कामे केली. परंतु शिवसेनेचे हिंगोलीत भाजपच्या मानाने कमी अस्तित्व असूनही शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी आक्रमकपणे प्रचार करीत काही दिवसांतच शहरात राजकीय उलथापालथ करीत भाजपला धुळ चारीत मोठ्या मताधिक्याने शिवसेनेच्या सौ रेखा श्रीराम बांगर यांना विजयी करण्यात यश मिळवले.

जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांचेसारखे दिग्गज नेते असतांना भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले ही भविष्यात भाजपसाठी चिंताजनक बाब समजली जात आहे. या पराभवामुळे जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून भाजपला गळती लागण्याची शक्यता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या काळात दिसणार असल्याचे बोलले जात आहे. स्थानिक नेते स्वत; आणि काही मोजक्याच कार्यकर्त्यांना सत्तेची फळे चाखण्याची संधी देत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे काम करणाऱ्या, सतरंज्या उचलणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी मिळत नसल्याचे दिसत आहे. निष्ठावंत कार्यकर्ते नाराज असल्याचे दिसत आहे. प्रचाराची धुरा एका नवख्या युवा नेत्याकडे दिली असल्यामुळे नगर पालिका निवडणुकीचे गणित जुळवता आले नाही अशीही चर्चा होत आहे तर भाजपमध्ये अंतर्गत वादही असल्यामुळे या निवडणुकीत भाजपला मोठ्या मताधिक्याने पराभवाला सामोरे जावे लागले अशीही चर्चा होत आहे. याच संधीचा फायदा शिवसेनेने हिंगोली शहरात उचलत नगर पालिकेवर शिवसेनेचा झेंडा फडकविला आहे. भाजपमध्ये आता स्थानिक नेत्यांना एकदिलाने काम करण्याची गरज आहे. परंतु सध्यातरी तशी परिस्थिती दिसत नाही.

कळमनुरी आणि वसमत नगर पालिकेत तर भाजपची दयनीय अवस्था पहायला मिळाली आहे. बोटावर मोजण्याइतके नगरसेवक निवडून आले आणि नगराध्यक्षपदाचे उमेदवारांना दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

हिंगोली जिल्ह्यात आ.तान्हाजीराव मुटकुळे यांनी कोट्यावधीचा निधी केंद्र व राज्य शासनाकडून खेचून आणला. विकास कामे केली परंतु याचा प्रचार आणि प्रसार करण्यात भाजप कमजोर ठरला हे सुध्दा पराभवाचे कारण असू शकते. शासनाकडून आलेली कामे कार्यकर्त्यांना दिल्यास त्यांनाही पक्षात काम करावे वाटेल केवळ मोजक्याच, जवळच्या कार्यकर्त्यांनाच वारंवार संधी दिल्यास कार्यकर्त्यांनी घरच्या भाकरी खाऊन काम करायचे का असा ही सूर कार्यकर्त्यांमधून उमटू लागला आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या तयारीला लागली असून दोन्ही ठिकाणी सभागृहात सत्ता आणण्यासाठी आखणी सुरू झाली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हिंगोली स्थानिक नेते व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना विजयाचा कोणता कानमंत्र देणार याकडे आता सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

# पालकसचिव बागला यांनी घेतला तीर्थक्षेत्र औंढा नागनाथचा आढावा

## सर्वसमावेशक आराखडा सादर करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

महाराष्ट्रातील प्रमुख ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र औंढा नागनाथच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याचा वित्त विभागाच्या प्रधान सचिव तथा जिल्ह्याच्या पालक सचिव रिचा बागला यांनी आज ऑनलाईन बैठकीत सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डी. जी. पोत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, नगर विकास विभागाचे सह आयुक्त आश्विनकुमार माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, भारतीय पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, जलसंधारण विभागाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

औंढा नागनाथ परिसरातील पायाभूत सुविधा, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व्यवस्था, भक्त निवास, स्वच्छता, सौंदर्यीकरण, परिसर विकास व पर्यावरणपूरक विकास यांचा समावेश असलेल्या २२१ कोटी ६२ लाख रुपयांच्या विकास आराखड्यावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित विकासकामांमध्ये कोणताही विलंब होऊ नये, तसेच धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन दृष्टिकोनातून या तीर्थक्षेत्राचा समतोल व नियोजनबद्ध विकास करून श्रीक्षेत्र औंढा नागनाथ हे जागतिक स्तरावर ओळखले जाणारे आकर्षण ठरावे, अशा सूचना पालक सचिव रिचा बागला यांनी दिल्या.

तयार करण्यात आलेला विकास आराखडा उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यासाठी आवश्यक परवानगी घ्यावी. तसेच आराखडा अंतिम करण्याच्या दृष्टीने पुढील आठवड्यात पुन्हा ऑनलाईन बैठक आयोजित करावी, असे निर्देशही पालक सचिव श्रीमती बागला यांनी दिले.

दरम्यान, श्रीक्षेत्र औंढा नागनाथच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासनामार्फत तयार करण्यात आलेल्या २२१ कोटी ६२ लाख रुपयांच्या विकास आराखड्याची तसेच भाविक व पर्यटकांना आदर्श सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सादरीकरणाद्वारे यावेळी दिली.

# घरकुलाचे प्रलंबीत हप्ते न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**




सेनगाव तालुक्यातील पळशी अंतर्गत येणाऱ्या घरकुल योजनेंतर्गत घरकुलाचे हप्ते पंचायत समितीकडून जाणूनबुजून रोखण्यात येत आहेत. दि ५ जानेवारीपर्यंत घरकुलाचे प्रलंबीत हप्ते न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा भाजपचे माजी जि प सदस्य नंदकिशोर खिल्लारे यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, पळशी अंतर्गत पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजनेतील लाभार्थींना मागील काही महिन्यांपासून घरकुलाचे हप्ते मिळाले नाहीत. सेनगाव पंचायत समितीतील अभियंता पुढाऱ्यांच्या सांगण्यावरून लाभार्थींचे हप्ते देण्यास अडवणूक करीत आहे. गोरगरीब लाभार्थी पंचायत समिती कार्यालयात चकरा मारीत आहेत परंतु त्यांची जाणूनबुजून अडवणूक करण्यात येत असल्यामुळे ते हवालदिल झाले आहेत. सेनगाव पंचायत समितीमध्ये अभियंत्यांची अशा प्रकारची वर्तणूक ही सर्वसामान्य व गोरगरीब लाभार्थ्यांसोबत नेहमीच होत असल्याच्या यापूर्वीही तक्रारी आल्या आहेत. अशा अभियंत्यांवर तत्काळ कार्यवाही करावी. येत्या ५ जानेवारीपर्यंत सर्व घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते त्यांच्या खात्यात जमा न केल्यास आत्मदहन करण्याचा इशारा घरकुल लाभार्थीसह जि प सदस्य नंदकिशोर खिल्लारे यांनी दिला आहे.

# भारतीय जनता पक्षाच्यावतीने अटल स्मृती कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**



भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी निमित्त अटल स्मृती संमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा सचिन किसन प्रसाद तिवारी यांची उपस्थिती होती. यावेळीजिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जेष्ठ नेते तुकाराम ढोणे, किसान मोर्चाचे प्र. उपाध्यक्ष सुरजीतसिंग ठाकूर, विजयराव कनके, दिलीपराव देसाई, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे शशिकांत वडकुते, दिनकर कोकरे, महेश गोविंदवार, संजय कावडे, रुपेश कदम, नंदू खिल्लारे, विद्याधर मगर, अजय कदम, बालाजी वानखेडे,मारोती देशमुख, पुष्पाताई शिंदे,बालाजी काळेवार, अरुण कदम, प्रशांत पाटील, किरण कनके,राजू पाटील, जिद्दी पाटील, विकास ठाकूर, शेरसिंग बावरी, इन्देश काबरा, राहुल मेने आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### उपमुख्याधिकारी शाम माळवटकर यांचा सत्कार



हिंगोली- हिंगोली नगरपरिषदेचे ऊपमुख्याधिकारी श्याम माळवटकर हे दि ३१ डिसेंबर २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. हिंगोली येथील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या दालनात नगरपरिषद उपमुख्य अधिकारी शाम माळवटकर यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी पाणीपुरवठ्याचीचे केशव मोटे, यांचा सत्कार केला. यावेळी नगरसेवक चंदू लव्हाळे, नगरसेवक सुमित कांबळे, नगरसेवक खल्ली बांगर यांच्यासह सर्व नगरपरिषद मधील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### सुरेगाव येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी




हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील सुरेगाव येथे मुख्यमंत्री ग्राम समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र लोहरा अंतर्गत उपकेंद्र सुरेगाव येथे आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी सुरेगाव येथील महिलांची एचबी तपासणी करण्यात आली. याचबरोबर जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींची आरोग्य (एचबी)तपासणी करण्यात आली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गजानन चव्हाण, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रघुनाथ बेंगाळ, आरोग्य सेविका संगिता गोबाडे, आरोग्य सेवक पी.एस.थिटे, तालुका लेखापाल पवन दरगु आदी उपस्थित होते. आरोग्य शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.

### बाळापूर येथील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील वंचीत बहुजन आघाडी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदेगटात प्रवेश घेतला आहे. येथील छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पूतळा परिसरात शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांच्या नेतृत्वात आखाडा बाळापूर येथील शेकडो वंचीत आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आ. बांगर कामाला लागल्याचे दिसत आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज हिंगोली जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज दि १ जानेवारी गुरूवारी हिंगोली जिल्हा दौऱ्यावर असून काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षात आ. डॉ प्रज्ञा सावत यांचा भव्य सत्कार सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत.

काँग्रेसच्या विधान परिषद सदस्या डॉ प्रज्ञा सातव यांनी काही दिवसांपूर्वी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुंबई येथे भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला होता.

त्यानंतर आता पुन्हा हिंगोली येथे आ. डॉ प्रज्ञा सातव यांचा हिंगोली येथेही भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील हॉटेल गणेश इन येथील सभागृहात दुपारी १ वाजता हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असून यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आ. रामराव वडकुते, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती असणार आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची डॉ प्रज्ञा सातव यांच्या सत्कार सोहळ्याला उपस्थिती असणार असून यानिमित्त जिल्ह्यात भाजपाला ओबीसी महिला प्रतिनिधी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी प्रोजेक्ट करण्याची तयारी आहे काय अशी चर्चाही होत आहे. दुसरीकडे नुकत्याच झालेल्या जिल्ह्यातील तीनही नगर पालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा दारूण पराभव झाला आहे. हिंगोली, वसमत आणि कळमनुरी या तीनही तालुक्यात भाजपला मित्र पक्षांनीच चारीमुंड्या चित करीत आभाळ दाखवले आहे.

आज नुकत्याच काँग्रेस पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये आलेल्या डॉ प्रज्ञा सातव यांचेकडे भाजप कोणती जबाबदारी सोपवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून त्यांच्या पक्षप्रवेशामुळे भारतीय जनता पक्षाला जिल्ह्यात किती फायदा होतो हे आता भविष्यात स्पष्ट होणार आहे.

# १४ लाख ७९ हजारांचा मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपूर्वक परत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

हिंगोली जिल्हा घटकातील पोलिस ठाणे स्तरावर आरोपींकडून जप्त करण्यात आलेला १४ लाख ७९ हजारांचा मुद्देमाल पोलिसांकडून फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे.

नूतन पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यात आरोपींकडून हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दि ३१ डिसेंबर रोजी जिल्हा घटकातील सर्व पोलिस ठाणे स्तरावर गुन्ह्यात आरोपीकडून हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याबाबत मोहीम राबविण्यात आली.या मोहीमेंतर्गत जिल्ह्यातील एकूण ४ गुन्ह्यांतील सोन्या चांदीचे दागिने व नगदी असे १ लाख ५४ हजार रूपयांचा मुद्देमाल, ७ लाख ५ हजार रूपयांची ३ वाहने व इतर ६ लाख २० हजारांचा मुद्देमाल फिर्यादींना सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी पदभार स्विकारल्यानंतर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन संबंधित पोलिस ठाण्यात करण्यात आले होते. सदरील मोहीम पोलिस अधीक्षक नीलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, प्रेमदास चव्हाण तसेच सर्व पोलिस ठाणे प्रभारी, मुद्देमाल मोहरील यांनी राबवली.

दि ३१ डिसेंबर रोजी हिंगोली शहर, कुरूंदा पोलिस ठाणे, नर्सी नामदेव पोलिस ठाणे, कळमनुरी पोलिस ठाणे, सेनगाव पोलिस ठाणे, वसमत ग्रामीण पोलिस ठाणे याठिकाणी फिर्यादीना आरोपींकडून हस्तगत केलेला मुद्देमाल सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे. भविष्यात अशाच प्रकारे मोहीम राबवून जास्तीत जास्त जप्त मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी सांगितले आहे.

# माजी जि प अध्यक्ष स्व बाबुराव पाटील गोरेगावकर यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**



माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर व माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुनील पाटील गोरेगावकर यांच्या वतीने येथील न्यू हायस्कूल व कैलासवासी बाबुराव पाटील माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी दहा ते बारा या वेळात साजरी करण्यात आली.

माजी आमदार स्व. बाबुराव पाटील गोरेगावकर यांची पुण्यतिथी दरवर्षी मोठ्या प्रमाणात गोरेगाव येथे साजरी करण्यात येते. माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर व माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुनील पाटील गोरेगावकर यांच्याहस्ते नानांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी चंद्रकांत हराळ, माजी जिल्हा परिषद सभापती संजय देशमुख, द्वारकादास सारडा भास्करराव बेंगाळ, मदन इंगोले, गणेशराव नाईकवाल, संचालक बबन नेतने, माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन क्षिरसागर, माजी सभापती गजानन पोहकर, प्रकाश देशमुख, बाजीराव पाटील जवळेकर, बालाजी गावंडे, रणजीत पाटील गोरेगावकर, द्विज पाटील मदन शेळके, अरुण पाटील आदींची उपस्थिती होती.

# मुस्लीम बांधवांकडून शिवसेना आ. संतोष बांगर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**



कळमनुरी व हिंगोली नगर पालिका निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकावून निर्विवाद यश प्राप्त केल्या बद्दल आमदार संतोषराव बांगर यांचा वारंगा फाटा येथील मुस्लिम बांधवांनी शेख सलीम भाई यांच्या नेतृत्वाखाली भव्य सत्कार केला.

यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी राजेश्वर पतंगे, विजयराव बोंढारे, रामभाऊ कदम, ओम कदम, शेख कलीम उर्फ गुड्डू, पप्पू अडकिने, खाजा सेठ बागवान, रफिक सेठ, युसुफ बागवान, खदीर बागवान, सुभान चौधरी, रहीम बागवान, हाफिज वाजिद, हाफिज नयुम, सय्यद गफ्फार, शेख निसार, समद बागवान, शेख मोहसीन, अतिक बागवान, वाजीद बागवान, मदार मौलाना, शेख अमीन, सोहेल रजा, शेख मुक्तार, सलीम इकबाल, चांद मणियार, अक्कू भाई, अजहर बागवान, शोएब बागवान, सलाम भाई, अरबाज सय्यद, इमरान बागवान, मुजाहेद शेख, सय्यद मुंतजीम, मोहम्मद यासीन, जुनेद रजा, हुजेब बागवान, शेख गफ्फार, इस्त्राईल शेख, मुसैफ, शेख वसीम, युनूस भाई, समद पैलवान, सय्यद मोईन, युनूस बागवान, इमरान खय्युम, जुनैद मन्नान, इलियास नाईक आदी उपस्थित होते.


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
पठाण जुम्माखा गुलशेरखा
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
सुखदेव जाधव
निष्ठावंत कार्यकर्ते


लोकनेते तथा आमदार
मा.श्री.अब्दुल
सत्तार साहेब यांचा
अभिष्टचिंतन सोहळा
तालुका प्रतिनिधी सिल्लोड
-दैनिक तरुण भारत
श्री.गजानन मरकडे
(मंगरुळकर)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
साबेर कुरेशी
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
डॉ.पठाण फेरोज खॉन
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
शेख बाबु शेख भिकन
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
रऊफ बागवान
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
आहेर सिध्देश्वर माणिकराव
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
चांद बेग मिर्झा
(नगरसेवक न.प.सिल्लोड)


मा.आ.अब्दुल सत्तार साहेब यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
हर शख्स को मिलती नहीं मनचाही मुरादे ।
हर कोई मुक्कदर का सिकंदर नही होता ।।
* शुभेच्छूक *
बालाजी प्लॉटिंग सेंटर
समृद्ध जीवनाच्या साक्षात्कार,
स्वप्नसुद्धा होतात साकार...
राका काम्प्लेक्स, शास्त्रीनगर, सिल्लोड
समर्था प्रॉपर्टीज्
बालाजीनगर, सिल्लोड
मो. ८८८८८८८७१९
अशोक रत्तनलाल राका


शिवसेना
मा. श्री अब्दुल
समीर भैय्या
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
जमीर मुलतानी
अरमान कंस्ट्रक्शनस तांडा बाजार
उपतालुका प्रमुख शिवसेना अल्पसंख्यक विभाग सिल्लोड


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
श्री.गणेश डोईफोडे
कुलस्वामीनी कंन्स्ट्रक्शन,सिल्लोड


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
रईसखा मुजावर
नगसेवक न.प.सिल्लोड


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
इमरान उर्फ गुड्डु
नगसेवक न.प.सिल्लोड


लोकनेते आमदार मा.श्री.
अब्दुल सत्तार साहेब
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक-
शेख कय्यु नजिर
नगसेवक न.प.सिल्लोड